।। श्रीः।।

**अध्यक्षीय मनोगत :**

नमस्कार, यंदाच्या वार्षिक सभेच्या सर्वसाधारण सभेत माझ्या अध्यक्षीय कार्यकालाची दहा वर्षे पूर्ण होत आहेत. विश्वस्त, कार्यकारी मंडळ आणि सर्व सभासद यांनी ज्या प्रेमाने आणि विश्वासाने ही जबाबदारी माझ्यावर सोपवली, त्याविषयी मी कृतज्ञता व्यक्त करतो. इतर अनेक व्यक्ती हे पद भूषविण्यास समर्थ आहेत याची मला जाणीव आहे. तरीही माझी तिसऱ्यांदा पुनर्नियुक्ती करण्यात सर्व संबंधितांच्या मनाचा मोठेपणाच दिसतो.

दहा वर्षांत अध्यक्षीय मनोगत लिहिताना केवळ मागील पानावरून पुढे अशी परिस्थिती कधीच आली नाही. 'मागील पाने' अधिक तेजस्वी आणि वाचनीय करून सतत 'नवी पाने' जोडण्याचे काम आपले कार्यकर्ते अविरतपणे, निरलसपणे करीत असतात. अपेक्षा केवळ लोकांच्या सहभागाची! कोणताही स्वार्थ नाही. तरुण कार्यकर्ते विज्ञान विभागाच्या माध्यमातून जोडले जात आहेत. यामुळे अनेकांना आपल्या संस्थेचा हेवा वाटतो.

मुलुंडचे केळकर ग्रंथालय आणि ऐरोलीचे सौ. सुनीता म. देवधर ग्रंथालय, दोन्हीकडचे कलाविभाग; तसेच मैत्रेयी आणि मैत्री महिला विभाग; संस्कृत विभाग, अर्थविभाग, आरोग्य विभाग, विज्ञान विभाग हे सगळेच विभाग नेहमीप्रमाणे स्पृहणीय काम करीत आहेत., तसेच ज्ञानेश्वर पुस्तक पेढी, दृष्टिसेवा केंद्र, ग्रंथ तुमच्या दारी, गिरिमित्र संमेलन व संगीत महोत्सव, वाचकसंवाद, विद्यार्थी गुणगौरव, ज्येष्ठ शिक्षक सन्मान, आषाढीची वारी, पितृस्मृती व्याख्यानमाला, निरनिराळे पुरस्कार हेही उपक्रम नित्याप्रमाणे यशस्वी होत आहेत. राज्यनाट्य स्पर्धेत यशस्वी सहभाग आहेच.

यंदाची वैशिष्ट्येही अनेक आहेत.....

राज्य नाट्य स्पर्धेत आपल्या संस्कृत नाटकाला पहिले बक्षीस आणि पं. प्रभाकर भातखंडे यांना लेखनाचे पहिले पारितोषिक मिळाले. सांस्कृतिक संचलनालयाकडून आपल्या संस्थेच्या गौरवार्थ एक लाख रुपयांच्या पुरस्कार दिला गेला. दृष्टिसेवा केंद्रातील सर्व ३० दृष्टिबाधित विद्यार्थी उत्तम तऱ्हेने उत्तीर्ण . अनेकांना ८० % पेक्षा अधिक गुण!

गेल्या वर्षी गोरेगावच्या श्री. सुधाकरजी आठले यांच्या देणगीतून त्यांच्या इच्छेनुसार संभाषणात्मक संस्कृतचा प्रसार करणाऱ्या दोन कार्यकर्त्यांना अुद्धवराव त्रि. आठले पुरस्कार नव्याने सुरू झाले. गद्रे पुरस्कार, सौ. देवधर पुरस्कृत सावित्रीबाई फुले पुरस्कार, श्री. पाटणकरांच्या सौजन्याने साहित्य साधना पुरस्कार, कै. साळगांवकरांनी संस्कृत कार्यकर्त्यांसाठी ठेवलेला लाटकरशास्त्री पुरस्कार, ग.के. करंदीकर उद्योजक सन्मान या देदीप्यमान शृंखलेत भर पडली ती 'वैद्य पाटणकर काढा'च्या विलास पाटणकरांनी पुरस्कृत केलेल्या 'प्रेरणा'पुरस्काराची! तिन्ही सैन्यदलातील कर्तृत्ववान व्यक्तींचा सन्मान तसेच भटनागर पुरस्कार मिळविणाऱ्या शास्त्रज्ञांचा सन्मान आपण केला. या निमित्ताने अनेक क्षेत्रांतील नामवंत दिग्गज येतात आणि महाराष्ट्र सेवा संघाचे मनापासून कौतुक करतात.

'मैत्रेयी'चे हे तिसावे वर्ष आहे. तर संस्था ८०व्या वर्षात पदार्पण करीत आहे. आपले एक ज्येष्ठ सभासद श्री. करंदीकर यांनी त्यासाठी रु. ८०,०००/-ची देणगी पाच वर्षांपूर्वीच दिली आहे!

ऐरोलीतील अभ्यासिका, अवयवदान चळवळीला साहाय्य, एकांकिका स्पर्धा, संस्कार शिबिर अशा सर्वच गोष्टी लोकप्रिय होत आहेत.

सर्वात मोठी उल्लेखनीय गोष्ट म्हणजे आपल्या तरुण कार्यकर्त्यांनी विचारपूर्वक सुरू केलेला नवा उपक्रम 'सॅल्यूट इंडिया'. देशभक्ती किंवा राष्ट्रीय जाणीव जोमाने सर्वत्र पोहोचविण्याची मोहीम. हा कार्यक्रम केवळ मुलुंडपुरता न ठेवता व्यापक करण्यासाठी दूरचे कार्यकर्तेही मिळत आहेत.

यंदाचे १५ वे गिरिमित्र संमेलन महिला गिर्यारोहकांविषयीचे होते. प्रचंड यशस्वी झाले.

'आपुलकी'च्या माध्यमातून दर तीन महिन्यांनी आपला सभासदांशी संवाद होतोच; पण लवकरच आपली 'वेबसाईट'ही अधिक सक्षम होईल. मुलुंड वास्तूच्या पुनर्विकासासाठी परिस्थिती अद्याप अनुकूल नाही. आज महाराष्ट्र सेवा संघाचा आदर्श ठेवून अनेक संस्था प्रगती करीत आहेत. त्यांना सर्वतोपरी सहकार्य आपण करतोच. सर्वांनी मिळून एकत्र काम करण्यातच सर्वांचे हित आहे.

अशा या अभिमानास्पद संस्थेच्या कामात सक्रिय भाग घेण्यासाठी पुढे येणाऱ्या प्रत्येकाचे मनापासून स्वागत आहे.

।। शुभं भवतु ।।

.....चंद्रशेखर वझे, अध्यक्ष.



Ahval text16.indd 1 2/2/2019 4:46:51 PM

# महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड


## विश्वस्त मंडळ

श्री. चंद्रशेखर ना. वझे (अध्यक्ष - पदसिद्ध)

श्री. मधुकर बा. देवधर
डॉ. आनंद रा. कट्टी
श्री. उल्हास कृ. हंबर्डे
श्री. सुरेश ना. पाटणकर
श्री.अजित ग. करंदीकर
श्री. रमेश दे. धामणकर


## कार्यकारी मंडळ

पदाधिकारी

श्री.चंद्रशेखर ना. वझे -अध्यक्ष
श्री.जयप्रकाश र. बर्वे -- कार्यवाह
श्री.विनोद म. सौदागर - सहकार्यवाह
श्री. प्रकाश ह. सडेकर-सहकोषाध्यक्ष
(स्वीकृत ९.८.१५ पासून)
श्री.चंद्रशेखर. म. कुलकर्णी–उपाध्यक्ष
श्री.धनंजय दि. दिवेकर- कोषाध्यक्ष
श्री.अरुण मो. भंडारे-सहकार्यवाह

### सदस्य

श्री.रवींद्र द. लाड
श्री.प्रदीप श्री. नाटेकर
श्री.विनायक ज. जोगळेकर
श्री.प्रभाकर रा. दामले
श्री. अवधूत पं. गोळे
(स्वीकृत९.८.१५ पासून)
श्री. सुधीर वा. बागाईतकर
(स्वीकृत ९ .८.१५ पासून)
श्री.दत्तात्रय व. कुलकर्णी
श्री.प्रदीप र. सप्रे
श्री. विजय वा. वझे
श्री. सतीश श्री. पाटणकर
श्री. शंकर गो. वीरकर
(स्वीकृत९.८.१५ पासून)

## ऐरोली व्यवस्थापन समिती

डॉ. आनंद रा. कट्टी - अध्यक्ष
श्री. शंकर गो. वीरकर - कार्यवाह
श्री. चंद्रशेखर ना. वझे (पदसिद्ध)
श्री. प्रदीप र. सप्रे - उपाध्यक्ष
श्री. सुधीर बागाईतकर -कोषाध्यक्ष
श्री. जयप्रकाश बर्वे (पदसिद्ध)

## मानद अंतर्गत हिशेब तपासनीस

श्री. श्रीहरी भी. कुलकर्णी (मुलुंडसाठी), श्रीमती ज्योत्स्ना जोशी (ऐरोलीसाठी)

## हिशेब तपासनीस

मेसर्स सिंगवी, ओतूरकर, केळकर आणि कंपनी (सी. ए.)



Ahval text16.indd 2 2/2/2019 4:46:53 PM

# महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड

**मुख्य कार्यालय व्यवस्थापन वर्ग**

श्री. संदीप परब — श्रीमती सुरेखा जोशी

**मुख्य कार्यालय सेवक वर्ग**

श्री. मोहन पवार — श्री. श्रीरंग भाष्टे

श्री. भास्कर इंगळे

**साहित्य सम्राट न. चिं. केळकर ग्रंथालय - व्यवस्थापन वर्ग**

श्रीमती अलका चौधरी — श्रीमती आरती रणदिवे

श्रीमती जान्हवी राणे

**साहित्य सम्राट न. चिं. केळकर ग्रंथालय सेवक वर्ग**

श्री. प्रदीप वाईकर — श्री. उमेश काणेकर

**ऐरोली शाखा कार्यालय - व्यवस्थापन वर्ग**

श्रीमती भारती सावंत -व्यवस्थापक — श्रीमती विनीता घाडीगांवकर

श्रीमती शीतल सगरे — श्रीमती शीतल झेंडे

**ऐरोली शाखा कार्यालय - सेवक वर्ग**

श्री. रमेश झोंबाड — श्री. शंकर शिंगोटे

श्री. सुरेंद्र राणे — श्री. शिवाजी पिसाळ

---

**महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड**

म. से. संघ मार्ग व पं. जवाहरलाल नेहरू मार्ग संयोग, मुलुंड (प.), मुंबई ४०० ०८०

दूरध्वनी : ०२२-२५६८१६३१/२५६९ ०२२५

e-mail: mss_mulund@rediffmail.com

Web Site: www.mssmulund.com

**ऐरोली शाखा**

म. बा. देवधर संकुल, म. से. संघ मार्ग, सेक्टर १७,

ऐरोली, नवी मुंबई - ४००७०८

दूरध्वनी : ०२२-२७७९१८३७/ २७७९०८३६

e-mail : mss.airoli@rediffmail.com

# महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड

म. से. संघ मार्ग व पंडित जवाहरलाल नेहरू मार्ग संयोग, मुलुंड (प.)

मुंबई - ४०० ०८०

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड संस्थेच्या सभासदांची वार्षिक सर्वसाधारण सभा (अहवाल वर्ष १ एप्रिल २०१५ ते ३१ मार्च २०१६) रविवार, दि. ७ ऑगस्ट २०१६ रोजी सायंकाळी ५.०० वा. संस्थेच्या मुलुंड येथील सु. ल. गद्रे सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. अध्यक्षांच्या प्रास्ताविकानंतर खालील कामांचा सभेत विचार होईल. या सभेला सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे ही विनंती.

### सभेपुढील कामे

१. दि. ९.८.२०१५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताचे वाचन करणे व इतिवृत्तांत निर्देशित केलेल्या मुद्यांबाबतच्या कार्यवाहीची माहिती घेणे आणि इतिवृत्त कायम करणे.

२. कार्यकारी मंडळाने तयार केलेल्या २०१५-१६ सालच्या अहवालास मान्यता देणे.

३. संस्थेच्या वैधानिक हिशेब तपासनिसांनी तपासलेल्या व विश्वस्त आणि कार्यकारी मंडळाने संमत केलेल्या २०१५-१६ सालच्या उत्पन्न व खर्चाचे हिशेब आणि आर्थिक ताळेबंदास मान्यता देणे.

४. २०१६-१७ सालाकरिता अंदाजपत्रक संमत करणे.

५. २०१६-१७ सालाकरिता वैधानिक हिशेब तपासनिसांची नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरविणे.

६. २०१६-१७ सालाकरिता मानद अंतर्गत हिशेब तपासनिसांची नियुक्ती करणे.

७. घटना कलम ११(ब) नुसार सभासदांकडून आलेल्या सूचनांचा विचार करणे.

८. घटना कलम १३(२) नुसार विश्वस्त मंडळातील २ रिक्त सदस्यांच्या जागा भरणे.

९. घटना कलम १८(९)नुसार कार्यकारी मंडळातून निवृत्त होणाऱ्या ५ सदस्यांच्या जागा भरणे.

१०. ऐरोली शाखेच्या कार्याची माहिती घेणे.

११. अध्यक्षांच्या परवानगीने येणारी आयत्या वेळची कामे.

### विशेष सूचना

१. गणसंख्येअभावी सभा तहकूब करावी लागल्यास तहकूब झालेली सभा ३० मिनिटांनंतर त्याच जागी भरेल व त्या सभेत आधीच्याच तहकूब झालेल्या सभेचे कामकाज राहील. या सभेस गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही.

२. सभासदांना सभांची इतिवृत्ते, हिशेबाच्या वह्या इ. पूर्वसूचनेने सोमवार, दि. २५ जुलै २०१६ ते बुधवार, दि.३ ऑगस्ट २०१६ पर्यंत सकाळी १० ते सायंकाळी ०७.३० या वेळेत (सुटीचे दिवस सोडून) कार्यालयांत पाहण्यास मिळतील.

३. कोणत्याही सभासदास काही माहिती हवी असल्यास अथवा काही सूचना करावयाच्या असल्यास त्यांनी त्या दि.४ ऑगस्ट २०१६ पर्यंत कार्यालयीन वेळांत लेखी स्वरूपात द्याव्यात.

४. सभासदाने आपला पत्ता बदलला असल्यास संस्थेस कळवावा.

५. संस्थेच्या सभासदांची यादी संस्थेच्या कार्यालयांत सभासदांच्या अवलोकनार्थ कार्यालयीन वेळांत उपलब्ध होईल. ज्या सभासदाचे नाव यादीत चुकून आले नसेल त्याने ताबडतोब कार्यालयात लेखी कळवावे.

६. विश्वस्तपदावरून श्री.मधुकर बा. देवधर व श्री. सुरेश ना. पाटणकर निवृत्त होत आहेत. तसेच कार्यकारी मंडळातून सर्वश्री चं. म.कुलकर्णी, प्र.श्री. नाटेकर, द.व.कुलकर्णी, प्र.र.सप्रे व वि.ज. जोगळेकर निवृत्त होत आहेत व ते पुन्हा निवडणुकीस उभे राहण्यास पात्र आहेत.

**निवडणूक कार्यक्रम**

१. निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी सर्वश्री चं.दि.खरे ,श्रीहरी भी. कुलकर्णी, व सु. स. सहस्त्रबुद्धे यांची निवडणूक समिती नियुक्त करण्यात आली आहे. श्री. चं.दि. खरे निवडणूक समितीचे प्रमुख असतील.

२. २ विश्वस्त व कार्यकारी मंडळातील ५ जागांसाठी निवडणूक रविवार, दि.७ ऑगस्ट २०१५ रोजी वार्षिक सर्वसाधारण सभेच्या वेळेत गुप्त मतदान पद्धतीने होईल. ३१.३.२०१५ पर्यंत सभासद झालेल्या व्यक्तींनाच या निवडणुकीत मतदान करता येईल. (सभासद क्र. आजीव९०० पर्यंत)

३. निवडणुकीची नामांकन पत्रे दि. २५ जुलै २०१६ ते २ ऑगस्ट २०१६ पर्यंत संस्थेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळांत मिळतील.

४. निवडणुकीची नामांकन पत्रे स्वीकारण्याची वेळ दि.३ऑगस्ट २०१६ रोजी सायंकाळी ७.०० वाजेपर्यंत आहे.
नामांकन पत्रांची छाननी दि. ३ ऑगस्ट २०१६ रोजी सायंकाळी ७.३० वाजता करण्यात येईल.

५. छाननीनंतर वैध उमेदवारांची यादी दि. ३ ऑगस्ट २०१६ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. नामांकन पत्र मागे घेण्याची वेळ दि. ४ ऑगस्ट २०१६ रोजी सायंकाळी ७.३० वाजेपर्यंत असेल.

६ निवडणुकीसाठी उभ्या असलेल्या उमेदवारांची अंतिम यादी दि.५ ऑगस्ट २०१६ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल.

मुलुंड, दि. १५ जुलै २०१६ — जयप्रकाश बर्वे (कार्यवाह)

**टीप : सभेनंतर सभासदांच्या स्नेहभोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. त्याचा सभासदांनी अवश्य लाभ घ्यावा.**

## ऋणनिर्देश

मुलुंड व ऐरोलीतील सर्व स्थानिक लोकप्रतिनिधी, पोलीसखाते, मुंबई महानगर पालिका, नवी मुंबई महानगर पालिका, धर्मादाय आयुक्त, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र शासन, सिडको, वृत्तपत्रे , आकाशवाणी, दूरदर्शन, सर्व दूरचित्रवाहिन्या, सर्व वार्ताहर, आय.डी.बी. आय. बँक लि., बँक ऑफ बरोडा, ठाणे जनता सहकारी बँक लि; अपना बाजार, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, ग.क. खांडेकर वाचनालय, पॉप्युलर प्रकाशन, ज्येष्ठ नागरिक संघ, मुलुंड पूर्व, रोटरी क्लब ऑफ मुलुंड, श्री. दीपक शहा, बॉम्बे मेडिकल एड फाऊंडेशन, दृष्टिसेवा केंदासाठी काम करणारे कर्मचारी, शिक्षकवर्ग, मदतनीस तसेच 'नॅब' यांचे तसेच गिरिमित्र संमेलनाचे तसेच इतर उपक्रमांचे सर्व देणगीदार, महाराष्ट्र सेवा संघाच्या सहकार्याने विविध उपक्रमांचे संयुक्त आयोजन करणाऱ्या सर्व संस्था व त्यांचे पदाधिकारी,
संस्थेला विविध सेवा पुरविणारे सर्व कंत्राटदार, कामत बॅन्क्वेटस् चे श्री. सतीश कामत , वैधानिक हिशेब तपासनीस मे. सिंघवी ओतूरकर व केळकर आणि कं. मानद अंतर्गत हिशेब तपासनीस श्री. श्रीहरी भी. कुलकर्णी, श्रीमती ज्योत्स्ना जोशी, श्री. माधव शिरवळकर, 'महाराष्ट्र टाइम्स'चे श्री. अशोक पानवलकर, श्री. विलास परुळेकर, श्री.समीर कर्वे, श्री. प्रवीण मुळ्ये, श्री. चिंतामणी भिडे, श्री. अजय पाटणकर, 'लोकसत्ता' चे श्री. विनायक सुतार, श्री. विकास महाडिक, 'सकाळ' चे संपादक श्री. विजय पात्रूडकर, श्री. आनंद मते, अभ्युदय बँक, कॉर्पोरेशन बँक, स्टेट बँक ऑफ त्रावणकोर, मुलुंड व ऐरोलीचे सर्व कार्यकर्ते आणि आमचे सर्व सभासद, हितचिंतक, व संस्थेचे सर्व काम आपुलकीने करणारा आमचा मुलुंड व ऐरोली येथील कार्यालय व ग्रंथालय व्यवस्थापन , सेवक वर्ग या सर्वांनी दिलेल्या बहुमोल सहकार्याबद्दल आम्ही ऋणी आहोत.

जयप्रकाश बर्वे (कार्यवाह) — चंद्रशेखर वझे (अध्यक्ष)

**टीप -**

अहवाल अद्ययावत करण्यासाठी त्यात संस्थेतील ३० जून १६ पर्यंतच्या घडामोडी देण्यात आल्या आहेत याची कृपया नोंद घ्यावी. आर्थिक नोंदी मात्र ३१ मार्च २०१६ पर्यंतच्या आहेत.



Ahval text16.indd 5 2/2/2019 4:46:54 PM

**पदाधिकारी सभा - उपस्थिती तपशील**

| अनु.क्र. | पदाधिकाऱ्याचे नाव | विश्वस्त | विश्वस्त व कार्यकारी मंडळ | कार्यकारी मंडळ |
|---|---|---|---|---|
| | एकूण सभा ➔ | २ | ४ | १० |
| १ | श्री. चं.ना.वझे | २ | ४ | १० |
| २ | श्री. म.बा.देवधर | १ | २ | - |
| ३ | श्री. सु.ना. पाटणकर | - | २ | - |
| ४ | श्री.आ.रा. कट्टी | १ | ३ | - |
| ५ | श्री.र.दे. धामणकर | २ | ३ | ४ |
| ६ | श्री.अ.ग. करंदीकर | २ | १ | - |
| ७ | श्री. उ.कृ.हंबर्डे | २ | ४ | - |
| ८ | श्री.चं.म.कुलकर्णी | - | ४ | ८ |
| ९ | श्री.ज.र.बर्वे | - | ४ | १० |
| १० | श्री.ध.दि.दिवेकर | - | २ | ५ |
| ११ | श्री.र.द.लाड | - | ४ | ८ |
| १२ | श्री.अ.मो.भंडारे | - | ३ | ८ |
| १३ | श्री.वि.म. सौदागर | - | ४ | १० |
| १४ | श्री. प्र.र. सप्रे | - | २ | ५ |
| १५ | श्री.द.व.कुलकर्णी | - | २ | ३ |
| १६ | श्री.वि.ज.जोगळेकर | - | १ | ७ |
| १७ | श्री. प्र.श्री. नाटेकर | - | ४ | १० |
| १८ | श्री.प्र.रा. दामले | - | ३ | ४ |
| १९ | श्री.वि.वा.वझे | - | ४ | ८ |
| २० | श्री.स.श्री.पाटणकर | - | ३ | ९ |
| २१ | श्री. अ.पं. गोळे | - | ४ | १० |
| २२ | श्री.प्र.ह.सडेकर | - | ३ | ७ |
| २३ | श्री.सु.वा. बागाईतकर | - | ३ | ८ |
| २४ | श्री.शं.गो.वीरकर | - | ४ | ८ |

**सभासदांना मिळणाऱ्या सवलती**

संस्थेच्या सभासदांस, सभासदत्वास एक वर्ष पूर्ण झाल्यानंतर केवळ त्यांच्या स्वतःच्या किंवा त्यांच्या मुलांच्या वा मुलींच्या लग्न, मौंजीबंधन, या कार्यांसाठीच सु.ल.गद्रे सभागृहाच्या भाड्यात रु.३,०००/- व सभागृह क्र.२च्या भाड्यात रु. २,०००/-ची सूट मिळते. एका सत्रासाठी नोंदणी केल्यास अनुक्रमे रु.१,५००/- व रु.१,०००/-ची सूट मिळते. तसेच ऐरोली येथे सभागृहाच्या भाड्यात रु.१,०००/- ची सूट मिळते.

**सभासद संख्या**

| सभासद श्रेणी | मार्च१५अखेर सभासद संख्या | अहवालसाली झालेले सभासद | दिवंगत झालेले सभासद | मार्च १६ अखेरीस सभासद संख्या |
|---|---|---|---|---|
| सन्माननीय | ७ | ६ | - | १३ |
| आधारस्तंभ | १३ | - | - | १३ |
| आश्रयदाते | ५ | - | - | ५ |
| पत्ता माहीत नसलेले | | | | ७५ |
| आजीव | ६४१ | २७ | ४ | ६६४ |
| **एकूण** | **६६६** | **२७** | **४** | **७७०** |

**अहवाल वर्षी सांस्कृतिक सभासद - मुलुंड येथे १७३ / ऐरोली येथे -३५**

सभागृह नोंदणीचा तपशील - अहवालवर्षी आपल्या संस्थेच्या सभागृहांत झालेले कार्यक्रम - **मुलुंड वास्तू**

| कार्यक्रम | सभागृह क्र.१व२ | सभागृह क्र.१व२ | सभांगण | सभागृह क्र.४ |
|---|---|---|---|---|
| लग्न,मुंज इ. प्रदर्शने, सामाजिक, सांस्कृतिक उपक्रम | ४०पू | ३४स | ५पू / स | २८ |

**ऐरोली वास्तू**

| कार्यक्रम | सभागृह क्र.१ वातानुकूलित | सभागृह क्र.१ बिगर वातानुकूलित | तळमजला | सभागृह क्र.२ |
|---|---|---|---|---|
| लग्न,मुंज इ. प्रदर्शने, सामाजिक, सांस्कृतिक उपक्रम | ३३पू/ १८स | २८पू/ १७स | ६१पू/३४स | २ वातानुकूलित<br>६० बिगर वातानुकूलित |

पू -पूर्ण वेळ, स-सत्रवार,

**श्रद्धांजली :**

डॉ. अरविंद प्रधान,(तह. ४०), प्रफुल्ला प्रधान (तह.१०२), चंद्रहास देवघरे (तह.४१५), रामचंद्र कदम (तह. २२१), नीलिमा विश्वनाथ पेंढारकर (तह.२४८), भूतपूर्व कार्यवाह श्री. सुधाकर रावजी काळसेकर यांच्या पत्नी श्रीमती शुभदा काळसेकर यांचे निधन झाले. सर्वांना महाराष्ट्र सेवा संघ परिवारातर्फे विनम्र श्रद्धांजली !

भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम, तसेच नाटककार, नाट्य लेखक श्री. संजीव वढावकर यांचे, थोर रंगकर्मी सुलभा देशपांडे , थोर गायिका वीणा सहस्त्रबुद्धे तसेच राजकीय, सामाजिक, शैक्षणिक तसेच क्रीडा व चित्रपट क्षेत्रांतील ज्या व्यक्तींचे अहवालसाली निधन झाले, अशा सर्वांना महाराष्ट्र सेवा संघ परिवारातर्फे विनम्र श्रद्धांजली !

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇

## महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड व ऐरोली शाखांच्या उपक्रमांसाठी तसेच स्थिर निधीसाठी मिळालेल्या देणग्या

| अनु. क्र. | तपशील | रुपये |
|---|---|---|
| | | |
| **गिरिमित्र संमेलनासाठी** | | |
| १ | इंडियन ऑईल कॉर्पोरेशन | १०,००० |
| २ | प्रोडक्ट प्रमोशन्स | २५,००० |
| ३ | अलाईड सेफ्टी इक्विपमेंट प्रा. लि. | १२,००० |
| ४ | वैद्य पाटणकर फार्मसी | २०,००० |
| ५ | इतर देणग्या | ७६,५०० |
| **आरोग्य विभागासाठी मिळालेल्या देणग्या** | | |
| १ | आरोग्य विभाग | १,००१ |
| | | |
| **विविध पुरस्कारांसाठी तसेच संस्थेच्या उपक्रमांसाठी मिळालेल्या देणग्या** | | |
| १ | श्रीमती सविता गद्रे (सु.ल. गद्रे पुरस्कारांसाठी) | १,५०,००० |
| २ | उपासना चॅरिटेबल ट्रस्ट | १,००,००० |
| ३ | फ्रंट एज इव्हेंट्स (दिगंबर प्रभु) | १५,००० |
| ४ | श्रीमती लीला मा. खांडेकर | ५०,००० |
| ५ | श्री. भा. ल. महाबळ | ५१,००० |
| ६ | श्रीमती शोभा रेळे | ५०,००० |
| ७ | श्री. भा. ल. महाबळ | ५१,००० |
| ८ | श्री. चं. ना. वझे | १०,००० |
| ९ | जिल्हा गंथालय अधिकारी कार्यालय | १८,००० |
| १० | इतर देणग्या | १,४३,९४४ |
| **ग्रंथालयासाठी मिळालेल्या देणग्या** | | |
| १ | श्री. सु.ना. पाटणकर (साहित्य साधना पुरस्कारासाठी) | २०,००० |
| २ | श्री. सु.ना. पाटणकर | १०,००० |
| ३ | ज्ञानेश्वर पुस्तक पेढीसाठी | २,५०० |
| **दृष्टिसेवा अभ्यासिकेसाठी मिळालेल्या देणग्या** | | |
| १ | श्रीमती सोनाली मंदार पाटणकर | १,००,००० |
| २ | श्रीमती मीना विजय खाडीलकर | ६०,००० |
| ३ | श्रीमती अपर्णा नायगांवकर | ११,००० |
| ४ | श्री. राजीव मेहेंदळे | १०,००० |
| ५ | श्रीमती अनुसयाबेन शहा | २५,००० |
| ६ | श्री. सुबोध निजसुरे | २०,००० |

| | | |
|---|---|---|
| ७ | स्पार्क इलेक्ट्रोसिस्टिम्स | २०,००० |
| ८ | इतर देणग्या | १,१८,३२६ |
| **अर्थ विभागाला मिळालेल्या देणग्या** | | |
| १ | श्रीमती अश्विनी अजित करंदीकर | ५०,००० |
| **प्रेरणा पुरस्कार** | | |
| १ | वैद्य पाटणकर फार्मसी | १,००,००० |
| २ | श्रीमती प्रज्ञा गोखले | ५,००० |
| ३ | श्री. अरुण भंडारे | ५,००० |
| **मैत्रेयी विभागाला मिळालेल्या देणग्या** | | |
| १ | मैत्रेयी विभाग | ५०० |
| | | |
| **संस्कृत विभागाला मिळालेल्या देणग्या** | | |
| १ | श्री. सुधाकर अुद्धवराव आठले | ४२,००० |
| २ | सुमंगल प्रेस प्रा.लि. (पं.लाटकरशास्त्री पुरस्कारासाठी) | २५,००० |
| ३ | श्रीमती शैलजा मळेकर | ३०,००० |
| ४ | श्रीमती सुहास जोशी | २५,००० |
| ५ | ओबेरॉय रिॲलिटी | ५,००० |
| ६ | इतर देणग्या | ३,३२२ |
| | | |
| **विज्ञान विभागाला मिळालेल्या देणग्या** | | |
| १ | श्रीमती साधना वझे | ३०,००० |
| २ | श्री. प्रकाश सडेकर | १०,००० |
| ३ | इतर देणग्या | १,००० |
| | | |

**संस्थेने दिलेल्या देणग्या**

| अनु. क्र. | देणगी दिलेली संस्था | देणगी रक्कम- रुपये |
|---|---|---|
| १ | महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था | ५,००० |
| २ | मुलुंड विद्या मंदीर | १५,००० |
| ३ | सह्याद्री मानव सेवा मंच | ५,००० |
| ४ | पत्रसारांश प्रतिष्ठान | ५,००० |
| ५ | आचार्य अत्रे समिती | ५,००० |
| ६ | स्वा.वि.दा. सावरकर स्मारक समिती | ३,००० |
| ७ | नववर्ष स्वागत यात्रा | ३,००० |
| ८ | उत्कर्ष स्टार मित्र मंडळ | ५,००० |
| | | |



Ahval text16.indd 9 2/2/2019 4:46:54 PM

## महाराष्ट्र सेवा संघाचे श्रीमती सविता गद्रे पुरस्कृत विविध पुरस्कार व इतर कार्यक्रम

| | | | |
|---|---|---|---|
| १ | ११ ऑक्टोबर २०१५ | महाराष्ट्र सेवा संघाचा सामाजिक संस्था पुरस्कार | स्नेहज्योती निवासी अंध विद्यालय, दापोली<br>प्रमुख पाहुणे - डॉ. विजय काणे<br>मुलाखत - रश्मी अनगळ, प्रियांका मोकाशी |
| २ | ३१ जानेवारी २०१६ | महाराष्ट्र सेवा संघाचा सु.ल. गद्रे साहित्यिक पुरस्कार | पुरस्कारप्राप्त साहित्यिक - विज्ञानकथा लेखिका माधुरी शानभाग , प्रमुख पाहुणे - उषा तांबे<br>मुलाखतकार - सुषमा जोशी |
| ३ | २७मार्च २०१६ | महाराष्ट्र सेवा संघाचा सु.ल. गद्रे कलाकार पुरस्कार | पुरस्कारप्राप्त कलाकार - सुहास जोशी,<br>प्रमुखपाहुणे - पुरुषोत्तम बेर्डे<br>मुलाखतकार - रश्मी आमडेकर |
| | | **नियमित व इतर कार्यक्रम** | |
| ४ | २६ एप्रिल २०१५ | सुनीता म.देवधर पुरस्कृत सावित्रीबाई फुले स्त्री गौरव पुरस्कार | पुरस्कारप्राप्त संस्था - प्रगती प्रतिष्ठान, जवाहर, सुनंदा पटवर्धन.<br>प्रमुख पाहुणे - डॉ. उदय निरगुडकर<br>मुलाखत - वासंती वर्तक |
| ५ | २५ डिसेंबर २०१५ | वैद्य पाटणकर पुनर्वसन संस्था पुरस्कृत प्रेरणा पुरस्कार | पुरस्कारप्राप्त सेनाधिकारी - कॅ. दिलीप परुळकर, कमांडर - रवींद्र वा. पाठक, सुभेदार मेजर अशक काशिद, इतिसास अभ्यासक अप्पा परब, प्रमुख पाहुणे - डॉ. शिवानंदन, माजी पोलिस महासंचालक |
| ६ | २५, २६ एप्रिल, १५ व २,३ मे १५ | चला बोलूया जपानी | |
| ७ | १८ ते २३ मे २०१५ | तुमचा कॅनव्हास तुम्हीच रंगवा | गोंद पेंटिंग, मधुबनी, वारली, लिप्पण |
| ८ | २८ मे २०१५ | स्वातंत्र्यवीर सावरकर व आपली धर्मनिरेक्षता | वक्ते डॉ. विष्णू वामन देशपांडे |
| ९ | १३ जून २०१६ | ध्वनिचक्र विद्या | डॉ. नितीन पाटणकर |
| १० | १९ जुलै २०१५ | वर्षा सहल | बदलापूर, विष्णूबाग |
| ११ | १५ ऑगस्ट २०१५ | झेंडा वंदन | |
| १२ | ७ सप्टेंबर २०१५ | गुणवत्ताप्राप्त विद्यार्थी सन्मान सोहळा, रोटरी क्लब ऑफ मुलुंड व अपना बाजार,मुलुंड(प.) यांच्या संयुक्त विद्यमाने | श्री. चं.ना. वझे, श्री. राजेंद्र धुल्ला ,रोटरी क्लब मुलुंड व अपना बाजारचे श्री. अनिल गंगर |
| १३ | १८ ऑक्टोबर २०१५ | कलास्वाद मंडळ | शैलभ्रमण गिर्यारोहण चित्र महोत्सव |
| १४ | ८ नोव्हेंबर २०१५ | पं. लाटकर शास्त्री संस्कृत सन्मान पुरस्कार | डॉ. मधुसूदन पेन्ना, कुलगुरू - कवि कुलगुरू कालीदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक |
| १५ | ८ नोव्हेंबर २०१५ | स्व. उद्धवराव त्रिविक्रम आठले स्मरणार्थ संस्कृत भाषा प्रसार पुरस्कार | १) सौ. तरंगिणी खोत<br>२)सौ. अर्चना कतिरा |
| १६ | १६ नोव्हेंबर २०१५ | सु. ल. गद्रे स्मृतिदिना निमित्त -मनाासून | गाण्यांचा कार्यक्रम |
| १७ | २० नोव्हेंबर २०१५ | कलास्वाद मंडळ | अनुभव कथन- अशोक राणे |



Ahval text16.indd 10 2/2/2019 4:46:54 PM

| | | | |
|---|---|---|---|
| १८ | २१ फेब्रुवारी २०१६ | अशोक सहस्त्रबुद्धे स्मृतिप्रीत्यर्थ | मंगेश पाडगांवकरांची गाणी - तुझे गीत गाण्यासाठी |
| १९ | ६ व ७ फेब्रुवारी २०१६ | संगीत महोत्सव | गायक : तारा कन्नन, जयतीर्थ मेवुंडी, आदित्य मोडक, देवकी पंडित<br>सतारवादन - पं. नयन घोष |
| | | | |
| **वर्धापनदिन सोहळा** | | | |
| ११ | ८ नोव्हेंबर २०१५ | अभिनव कल्याण निर्मित लेझीम खेळणारी पोरे | नाटक |
| १२ | १०नोव्हेंबर, २०१५ | दिवाळी पहाट | सुधीर मोघे यांच्या गीतांवर आधारित - फिटे अंधाराचे जाळे |
| १३ | १२ नोव्हेंबर, २०१५ | नाथ हा माझा | बंदिशी आणि नाट्यगीते |

# कौतुक सोहळा - गुणवत्ता प्राप्त विद्यार्थी सन्मान

महाराष्ट्र सेवा संघातर्फे मुलुंड मधील विद्यार्थ्यांना प्रदान करण्यात आलेली विविध पारितोषिके :

**कै. राम गणेश गडकरी पारितोषिक** : मार्च २०१५ मध्ये झालेल्या शालांत परीक्षेत उच्च मराठी विषय घेऊन मराठीत सर्वाधिक गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस,

| | | |
|---|---|---|
| प्रांजल गुरव | सेंट मेरीज कॉन्व्हेंट | ९२/१०० |

**महर्षी अण्णासाहेब कर्वे पारितोषिक** : मार्च २०१५ मध्ये झालेल्या शालांत परीक्षेत सर्वाधिक गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थिनीस,

| | | |
|---|---|---|
| शिवानी दात्ये | आय.ई.एस. सेकंडरी स्कूल | ९६.८० % |

**कै. अंबादास डांगे पारितोषिक** : मार्च २०१५ मध्ये झालेल्या शालांत परीक्षेत संस्कृत या विषयात सर्वाधिक गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस,

| | | |
|---|---|---|
| धन्वी मेहता | सेंट मेरीज कॉन्व्हेंट | १०० |

**श्री. सु.ल. गद्रे पारितोषिक** : मार्च २०१५ मध्ये झालेल्या शालांत परीक्षेत मुलुंड मधील महानगर पालिकेच्या माध्यमिक मराठी विद्यालयातून सर्वाधिक गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस,

| | | |
|---|---|---|
| वैशाली कोरी | मुलुंड म्युनिसिपल स्कूल | ८० % |

**कै. विठ्ठलराव व कै. सुशीला घाटणेकर पारितोषिक** : मार्च २०१५ मध्ये झालेल्या शालांत परीक्षेत सर्वाधिक गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस,

| | | |
|---|---|---|
| शिवानी दात्ये | आय.ई.एस. सेकंडरी स्कूल | ९६.८० % |

**सौ सुषमा केतकर पारितोषिक :** मार्च २०१५ मध्ये झालेल्या शालांत परीक्षेत मुलुंडमधून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस,

| | | |
|---|---|---|
| शिवानी दात्ये | आय.ई.एस. सेकंडरी स्कूल | ९६.८० % |

**कै. डॉ. सदाशिव अं. डांगे स्मृती पारितोषिक :** मार्च २०१५ मध्ये झालेल्या शालांत परीक्षेत मुलुंडमधील शाळांतून प्रथम क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यात व प्रथम व द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस,

| | | |
|---|---|---|
| शिवानी दात्ये | आय.ई.एस. सेकंडरी स्कूल | ९६.८० % |
| मेघना पायस | सेंट मेरीज कॉन्व्हेंट | ९६.२० % |

**कै. हरेश्वर केशव लोखंडे स्मृती पारितोषिक** : मार्च २०१५ मध्ये झालेल्या शालांत परीक्षेत मुलुंड मधील माध्यमिक शाळांतून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस,

| | | |
|---|---|---|
| वैशाली कोरी | मुलुंड म्युनिसिपल स्कूल | ८० % |

**कै. मुरलीधर सुका चौधरी पारितोषिक** : मार्च २०१५ मध्ये झालेल्या शालांत परीक्षेत मुलुंड मधील शाळांतून गणित विषयात उत्तम गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस,

| | | |
|---|---|---|
| ईशा वाजपेयी | लोकमान्य टिळक इंग्लिश | ९९ |
| ईशा मुलानी | सेंट मेरीज कॉन्व्हेंट | ९९ |
| अनिशा शेट्टी | सेंट मेरीज कॉन्व्हेंट | ९९ |



Ahval text16.indd 12 2/2/2019 4:46:54 PM

# संस्कृत विभाग

गुरुप्रसाद कार्लेकर (अध्यक्ष) सुमेधा नवाथे (कार्यवाह)
**सदस्य :** चं. ना. वझे, चं.म. कुलकर्णी, भावना दांडेकर, मुग्धा गोळे, प्रसाद गोडसे

**संस्कृत रसास्वाद वर्ग** - दि. १७.०८.१९८५ पासून सुरु केलेला हा उपक्रम यावर्षीही जोमाने सुरू राहिला. २८.८.२०१५ रोजी ह्या वर्गाचा ३० वा वर्धापनदिन साजरा केला. वर्धापनदिनाच्या समारंभात श्री. प्रभाकर भातखंडे यांचे आरती या विषयावर व्याख्यान झाले. हया वर्षी एकूण ४१ वर्ग झाले. केनोपनिषद, मूर्तिपूजा आणि मंत्र, श्राद्ध संकल्पना, शिवमानसपूजा, मेघासूक्त इत्यादी विषयांचा अभ्यास पूर्ण झाला.

**व्याख्यान व कलाकार कौतुक सोहळा-** १३ एप्रिल २०१५ रोजी श्रीमती मेघा लिमये यांचे 'लालित्य लीलावतीचे' हे थोर गणिती भास्कराचार्यांच्या 'लीलावती' या ग्रंथावरील विवेचनात्मक दृकश्राव्य व्याख्यान आयोजित केले होते. त्यांच्या हस्ते 'भगवदज्जुकीयम् ' ह्या गतवर्षीच्या विविध पारितोषिक प्राप्त नाटकातील कलाकारांचा व तंत्रज्ञांचा कौतुक सोहळा आयोजित करण्यात आला होता.

**संस्कृतत्रिवेणी** - ८ नोव्हेंबर २०१५ रोजी संस्कृत त्रिवेणी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. पुढे नमूद केलेल्या ३ कार्यक्रमांनी 'संस्कृत त्रिवेणी' संपन्न झाली

१. पंडित वासुदेव आत्माराम लाटकरशास्त्री संस्कृत सन्मान पुरस्कार - संस्थेतर्फे संस्कृतचे अभ्यासक, कालनिर्णयकार स्व. जयंतराव साळगांवकर यांच्या संकल्पनेप्रमाणे संस्कृतच्या अध्ययन, अध्यापन, व प्रसाराचे उत्तम कार्य करणा-या एका मान्यवरास प्रतिवर्षी पंडित वासुदेव आत्माराम लाटकरशास्त्री संस्कृत सन्मान पुरसक्राने सन्मानित करण्यात येते. सन्मान्य डॉ. देवदत्त पाटील, डॉ. भाग्यलता पाटसकर, डॉ. मल्हार कुलकर्णी, श्री. गणेश्वर सांब दीक्षित यांना याआधी या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह व रु. ५१०००/- असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. ह्या वर्षीचा पं. लाटकरशास्त्री पुरस्कार डॉ. मधुसूदन पेन्ना, एम.फिल., पी.एच.डी., विभाग प्रमुख, भारतीय तत्त्वज्ञान विभाग कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक, नागपूर यांस डॉ. सौ. गौरी माहुलीकर एम.ए., पी.एच.डी. माजी संस्कृत विभाग प्रमुख, मुंबई विद्यापीठ. यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

२. स्व. अुद्धवराव त्रिविक्रम आठले स्मरणार्थ संस्कृत भाषा प्रसार पुरस्कार - श्री. सुधाकर अु. आठले यांनी संस्थेच्या संस्कृत विषयक कार्याने प्रभावित होऊन या वर्षीपासून स्व. अु. त्रि. आठले स्मरणार्थ संस्कृत भाषा प्रसार पुरस्कार प्रदान सोहळ्याच्या आयोजनाची जबाबदारी संस्थेवर सोपविली आहे. भारतात संस्कृत ही लोकभाषा, बोलीभाषा, व्यवहाराची भाषा व्हावी या हेतूने हा पुरस्कार आयोजित केला आहे. संस्कृत लोकभाषा व्हावी म्हणून कार्य करणाऱ्या दोन व्यक्तींना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह व रु. २१०००/- असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. स्व. अुद्धवराव त्रि. आठले संस्कृत भाषा प्रसार पुरस्कारांच्या **पहिल्या मानकरी -**

१. सौ. तरंगिणी खोत, एम.ए.बी.एड. व २. सौ. अर्चना कतिरा एम.ए.

'संस्कृतभारती' च्या माध्यमातून संस्कृत प्रसाराचे कार्य करणाऱ्या या दोन विदुर्षीना डॉ. सौ. गौरी माहुलीकर एम.ए., पी.एच.डी. माजी संस्कृत विभाग प्रमुख, मुंबई विद्यापीठ यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला.

३. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात डॉ. प्रसाद भिडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी, 'प्रतिमा - अ स्टँड अप म्युझिकल शो' हा अभिनव प्रयोग सादर केला. भासाच्या 'प्रतिमा' या नाटकाचे रसग्रहण नाट्यरुपात या प्रयोगात सादर केले गेले.

संस्कृत त्रिवेणी कार्यक्रमाची सांगता संस्थेच्या संस्कृत विभागाचे कार्यकर्ते डॉ. प्रसाद भिडे व डॉ. दिपेश कतिरा यांनी पी.एच.डी. मिळवल्याबद्दल श्री. प्रभाकर भातखंडे व डॉ. मल्हार कुलकर्णी यांच्या हस्ते सन्मान करुन झाली.



Ahval text16.indd 13 2/2/2019 4:46:54 PM

महाराष्ट्र राज्य संस्कृत नाट्य स्पर्धा - प्रतिवर्षाप्रमाणे या वर्षीही ५५व्या, संस्कृत राज्य, नाट्य स्पर्धेत संस्कृत विभागाने अक्षगानम् हे एकांकी नाटक ३० डिसेंबर २०१५ रोजी नाशिक येथे सादर केले, सदर नाटकास राज्यातून प्रथम क्रमांक प्राप्त झाला. तसेच लेखक श्री. प्रभाकर भातखंडे यांना लेखनाचे प्रथम पारितोषिक प्राप्त झाले. या नाटकात प्रसाद भिडे, कल्पेश दळवी, प्रसाद गोडसे, गुरुप्रसाद कार्लेकर, भाग्यश्री जांभवडेकर, राधिका भडभडे, वृषाली सावंत, इंद्रजित दुडिले, प्रणव कुटकुटे, अक्षय वाडेकर, या कलाकारांनी उत्कृष्ट अभिनय सादर केला. सदर नाटकासाठी तंत्रज्ञ म्हणून आनंद केळकर, वरदा नवाथे, निशिकांत उजवणे, धनंजय जोशी, विश्वास बर्वे, प्रकाश सानप, नीलिमा पुराणिक, चंद्रशेखर कुलकर्णी, राम पाणकर, मुग्धा गोळे, अवधूत गोळे, सुमेधा नवाथे यांनी योगदान दिले. सर्व कलाकारांचे हार्दिक अभिनंदन.

प्रथम पारितोषिक विजेते संस्कृत नाटक अक्षगानम् चा एक विशेष प्रयोग आय.आय.टी. पवई येथे २७ जानेवारी २०१६ रोजी Convocation Hall Auditorium मध्ये सादर करण्याची विभागाला संधी मिळाली.

कलाकार कौतुक सोहळा - २५ फेब्रुवारी २०१६ रोजी प्रथम पारितोषिक विजेत्या संस्कृत नाटक अक्षगानम् मधील कलाकार व तंत्रज्ञांचा भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. संस्थेचा एक लोककलाकार श्री. कल्पेश दळवी यांनी जागर लोककलेचा असा एक बहारदार कार्यक्रम या दिवशी सादर केला.

सुमेधा नवाथे (कार्यवाह) गुरुप्रसाद कार्लेकर (अध्यक्ष)

## आरोग्य विभाग



र. दे. धामणकर - अध्यक्ष, वि.स.जोशी - कार्यवाह ( ३० सप्टेंबर २०१५ पर्यंत)
**सदस्य :** र. द. लाड, वि. म. सौदागर, वि. ज. जोगळेकर, प्र.र. दामले, वि.स. जोशी, सु.ह.बागाईतकर

सन्माननीय आरोग्यमित्र हो! सप्रेम नमस्कार,

संस्थेचे आर्थिक वर्ष संपले असले तरी आरोग्यविषयक माहितीपत्र सुरूच असते. मागील वर्षात ध्वनी-नाद यांद्वारे आरोग्यावर होणाऱ्या बऱ्या-वाईट परिणामांविषयी व्याख्यान झाले, त्याचप्रमाणे मधुमेह, कॅन्सर यांसारख्या असाध्य रोग व त्यासंबंधी घ्यावयाची काळजी व पथ्य यांविषयी माहिती देणारे कार्यक्रम संपन्न झाले.
या वर्षीची अत्यंत महत्त्वाची बाब म्हणजे 'युनो'(UNO) च्या १७७ देशांनी २१ जून हा दिवस 'जागतिक योग दिन' म्हणून घोषित केला. या निमित्ताने दि.२१ जून २०१५ ते २७ जून २०१५ या काळात सर्व वयोगटातील नागरिकांसाठी आपल्या संस्थेच्या वतीने व आरोग्य भारती आणि डॉ. श्रद्धा उपासनी यांच्या सौजन्याने 'योग सप्ताह' आयोजित करण्यात आला. याच सप्ताहात बंगळुरू येथील 'योगविद्यानिकेतन' या जगप्रसिद्ध संस्थेतील योग शिक्षकांनी योगविषयक माहिती देऊन प्रात्यक्षिकेही दाखविली. उपस्थितांना मधुमेहाविषयी माहिती देण्यात आली. या सप्ताहाच्या सुरुवातीला व शेवटच्या दिवशी 'एस्. आर. एल्. पॅथेलॉजी' तर्फे सहभागी शिबिरार्थींची रक्त तपासणी करण्यात आली, त्यामुळे योग प्रशिक्षण सुरू करण्यापूर्वी व प्रशिक्षणाच्या शेवटी करण्यात आलेल्या रक्ततपासणीमध्ये शर्करा नियंत्रण करण्यात मोठी मदत झाली असे दिसून आले. या उपक्रमात पुरुष व स्त्रिया मिळून ४० व्यक्ती सहभागी झाल्या होत्या.
**१२ सप्टेंबर, २०१५** - आपली संस्था, वैद्य साने ट्रस्ट आणि माधवबाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'आरोग्यम् हृदय संपदा' या उपक्रमाद्वारे हृदयाची काळजी कशी घ्यावी तसेच तणावमुक्त जीवन पद्धती यामुळे हृदयविकार कसा टाळता येतो या विषयावर डॉ. स्मिता झांबरे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले व हृदयरोगाची प्राथमिक लक्षणे आणि त्यासंबंधी घ्यावयाची काळजी या विषयाची माहिती दिली.
**२४ जानेवारी २०१६** - आपली संस्था आणि अखिल भारतीय पातळीवर काम करणाऱ्या 'आरोग्यभारती' व इतर सहभागी संस्थांच्या संयुक्त विद्यमाने नेरूळ येथे 'गर्भसंस्कार' या विषयावर एकदिवसीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. महाराष्ट्रातील अत्यंत नामवंत डॉक्टरांनी गर्भवती स्त्रीचे शारीरिक व मानसिक आरोग्य उत्तम राहाण्यासाठी व सुरुवातीपासूनच मुलांवर चांगले संस्कार कसे



Ahval text16.indd 14 2/2/2019 4:46:54 PM

करावे व ते किती महत्त्वाचे आहे , या विषयी प्रबोधन केले.
या व्यतिरिक्त वाडा, जि. पालघर या विभागातील 'अंबा माता-बालक व बालिका अनाथाश्रम', अंबिस्ते या आदिवासी संस्थेला आरोग्य विभागाच्या प्रतिनिधींनी भेट दिली. या आदिवासी भागात आरोग्य शिबिर आयोजित करण्याचा आरोग्य विभागाचा मानस आहे.
सध्या आपली संस्था व बॉम्बे मेडिकल एड फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मुलुंड(प.) येथे सुरू असलेल्या धर्मादाय दवाखान्याचा व भौतिक उपचार (फिजिओ थेरपी) केंद्राचा अनेक रुग्ण लाभ घेत आहेत.

र.दे धामणकर, अध्यक्ष

## आपुलकी

संपादक - चंद्रशेखर वझे, कार्यकारी संपादक - सुषमा पाटणकर, संपादन साहाय्य : दत्तात्रय व. कुलकर्णी, विनोद सौदागर, रवींद्र लाड, नंदिनी हंबर्डे , रजनी करंदीकर, अरुण भंडारे.

'आपुलकी' या त्रैमासिक मुखपत्राची वाटचाल यशस्वीपणे सुरू आहे. या अहवाल वर्षात दिवाळी अंकासहित चारही आवृत्त्यांमध्ये विविध विषयांवरील लेख, मुलुंड वा मुलुंड परिसरातील यशस्वी व्यक्तींचे परिचय, आरोग्य, संगीत, भाषा, नाट्य, सामाजिक समस्या इ. विषयांवरील सकस लेख प्रसिद्ध झाले; थोडक्यात सांगायचे झाल्यास 'आपुलकी'च्या धोरणास अनुसरून सकारात्मक, विधायक, व प्रेरक अशा विषयांवरील साहित्य प्रसिद्ध करण्यात आले. उपक्रमाला वाचकांचा चांगला प्रतिसाद लाभतो आहे.

सुषमा पाटणकर,
कार्यकारी संपादक, आपुलकी

## मैत्रेयी- महिला विभाग

माधवी भुसारी( अध्यक्ष), प्रियांका मोकाशी (कार्यवाह), रजनी करंदीकर (सहकार्यवाह )
सदस्य : सुषमा पाटणकर, सुनीता देवधर, इंदिरा कुलकर्णी, वासंती वैद्य, सुमती खरे, नंदिनी हंबर्डे, रश्मी अनगळ, वीणा नाटेकर, मेधा देव.

**मैत्रेयी अहवाल : २०१५ -१६**

यावर्षी मैत्रेयीने ३० व्या वर्षात पदार्पण केले आहे. दर महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या मंगळवारी 'अक्षरमैत्री' या उपक्रमांतर्गत विविध विषयांवर व्याख्याने आयोजित केली जातात. यामध्ये इतर मान्यवरांबरोबरच स्थानिक महिलांनाही कार्यक्रम सादर करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. याबरोबरच स्नेहसंमेलन, महिला दिन, वासंतिक मेळावा व कोजागिरी पौर्णिमेनिमित्त विशेष कार्यक्रम आयोजित केले जातात. अहवाल वर्षाचे कार्यक्रम पुढीलप्रमाणे होते.

**दि. २ जून, २०१५ :** 'मुक्तसंवाद' या कार्यक्रमांतर्गत 'माधवबाग हार्ट केअर सेंटर'ची कार्यकर्ती योगिता शिंदे हिने हृदयरोग म्हणजे काय ? तो होऊ नये म्हणून घ्यावयाची काळजी, आहार-विहार इत्यादीबाबतची जागरूकता व सेंटरमधील उपक्रमांबद्दल सविस्तर माहिती दिली. त्यानंतर मैत्रिणींनी 'वटसावित्री' या व्रताचे आजचे स्वरुप, टी.व्ही. मालिकांमधील 'झाडे लावा व जगवा' या संदेशाविषयी व पर्यावरणाविषयी आपले विचार मांडले.

**दि. १६ जून, २०१५ :** पहिल्या आंतरराष्ट्रीय योगदिनाचे औचित्य साधून मैत्रेयीने योग तुझा घडावा या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. सुप्रसिध्द योगाचार्य बी.के.एस. अय्यंगार गुरूजी यांच्या शिष्या ज्योती करंदीकर यांनी, कुणालाही कुठेही करता येतील व कुठल्याही व्याधी असताना करता येतील अशा सोप्या आसनांचे प्रात्यक्षिक दाखविले. कार्यक्रमाला स्त्री-पुरुषांचा उदंड प्रतिसाद मिळाला.

**दि. ७ जुलै, २०१५ :** अधिकमासानिमित्त मंजूषा भाभे यांचे कीर्तन आयोजित केले होते. नामभक्ती (अहंकार) या विषयावर त्यांनी ओघवत्या शैलीत निरुपण केले.



Ahval text16.indd 15 2/2/2019 4:46:55 PM

**दि. २१ जुलै, २०१५ :** आषाढी एकादशीनिमित्त 'तुका झालासे ग्लोबल' या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कार्यक्रमाची संकल्पना व निवेदन होते मधुरा भहंत व स्वप्ना पटवर्धन यांचे व सुरेखा जोशी यांनी अभंगांचे सादरीकरण केले.

**दि. ४ ऑगस्ट, २०१५ :** 'आपुले मरण पाहिले म्या डोळा' या कार्यक्रमांतर्गत डॉ. लता पाठक यांनी गेल्या वर्षी काश्मीरमधील पुरात अडकल्यानंतर आलेले अनुभव सांगितले. कठीण प्रसंगात त्यांनी दाखविलेले मनोधैर्य वाखाणण्यासारखे होते.

**दि. १८ ऑगस्ट, २०१५ :** महाराष्ट्र सेवा संघाच्या कार्यकर्त्या स्मिता जोशी यांनी स्वलिखित रूपक कथांचे ओघवत्या शैलीत अभिवाचन केले.

**दि. १ सप्टेंबर २०१५ :** मातृदिनानिमित्त 'मातृदेवोभव' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले होते. ठाण्याच्या 'अंकुर ग्रुप'ने पौराणिक काळापासून ते आधुनिक काळापर्यंत विविध स्तरातील मातांच्या कार्याचा सांगीतिक आढावा घेतला.

**दि. १५ सप्टेंबर, २०१५ :** 'उपासनेला दृढ चालवावे' या कार्यक्रमात मैत्रेयीच्या सुषमा पाटणकर व रजनी करंदीकर यांनी परंपरेनुसार चालत आलेल्या पूजा-अर्चा करण्यामागील शास्त्रीय कारणांचे महत्त्व विशद केले.

**दि. ६ ऑक्टोबर, २०१५** : पितृपंधरवड्याच्या निमित्ताने 'मृत्यू सर्वांग सोहळा' हा संगीतमय कार्यक्रम आयोजित केला होता. मृत्यूला न घाबरता जन्म-मृत्यूकडे सकारात्मक दृष्टिकोनातून कसं पहावं हे सांगणाऱ्या कार्यक्रमाची संकल्पना, लेखन व निवेदन होते प्रज्ञा गोखले यांचे. संगीत साथ दिली होती सुरेखा जोशी यांनी.

**दि. १४ ऑक्टोबर, २०१५ :** मुलुंडमधील सर्व महिला मंडळांच्या सहभागाने ५२ वा 'शारदोत्सव' संपन्न झाला. यामध्ये दोन कार्यक्रम सादर झाले. थोर संत गाडगेबाबा यांच्या कार्यावर आधारित 'देवकी नंदन गोपाला' या कार्यक्रमात सुनिता केळकर यांनी गाडगेबाबांच्या कार्याची महती सांगितली. आधुनिक वाल्मिकी ग.दि.माडगूळकर यांच्या साहित्यावर आधारित 'गदिमायन' हा संगीतमय कार्यक्रम सादर केला स्वाती गुणे व कल्पना भावे यांनी. सहभागी मंडळे : १) मैत्रेयी २) कल्पना विहार महिला मंडळ ३) आराधना महिला मंडळ ४) चित्तपावन ब्राह्मण महिला मंडळ ५) रुद्राणी पुरोहिता मंडळ ६) देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण महिला मंडळ ७) राष्ट्र सेविका समिती

**दि. २७ ऑक्टोबर, २०१५ :** रोजी कोजागिरीनिमित्त 'खेळ खेळूया साऱ्या मिळूनी' हा विविध गमतीशीर खेळांचा कार्यक्रम मैत्रेयीने आयोजित केला होता.

**दि. ३ नोव्हेंबर, २०१५ :** रोजी 'वाचू आनंदे' या कार्यक्रमात उपस्थित मैत्रिणींनी आवडलेले लेख, कविता, उतारे वाचून दाखविले व वाचनानंदात सर्वांना सहभागी करून घेतले.

**दि. १७ नोव्हेंबर, २०१५ :** 'ऊर्मी' या कार्यक्रमात ठाणे भूषण उर्भिला भूतकर यांनी विविध सामाजिक प्रश्नांवर सत्य घटनांच्या आधारे आपले विचार मांडले.

**दि. १ डिसेंबर, २०१५ :** 'मितले परि रसाळ (ओवी ते चारोळी )' या कार्यक्रमात मिनोती घारपुरे यांनी ओवी, हायकु, चारोळी यासारख्या छोट्या काव्यप्रकारातून व्यक्त होणाऱ्या आशयाविषयी ओघवत्या शैलीत विवेचन केले. कार्यक्रम मनाला भावून गेला.

**दि. १५ डिसेंबर, २०१५ :** मुलुंडमधील आयुर्वेदिक डॉक्टर सुप्रिया भिडे-शहा यांनी 'वेगळेपण आयुर्वेद चिकित्सेचे' या अभ्यासपूर्ण व्याख्यानात आयुर्वेदात सांगितलेल्या त्रिदोष प्रकृती, पथ्य, अनुपान, औषधाची मात्रा, आयुर्वेद औषधांची एक्सपायरी, पंचकर्म चिकित्सा याविषयी सविस्तर माहिती सांगितली. त्यामुळे उपस्थितांच्या मनातील आयुर्वेद चिकित्सेसंबंधी असणारे गैरसमज दूर होण्यास मदत झाली.

**दि. ५ जानेवारी, २०१६ :** 'मुक्तसंवाद' या कार्यक्रमात पुढीलपैकी एका विषयावर आपले विचार मांडण्याची संधी मैत्रिणींना मिळाली. विषय होते - १) मला आवडलेला दिवाळी अंक २) सरत्या वर्षातील मनावर ठसलेली घटना ३) वैज्ञानिक दृष्टिकोन ४) बदलती जीवनशैली आणि वाढणा-या समस्या. विषय आगाऊ दिल्यामुळे मैत्रिणींनी अभ्यासपूर्णरीत्या आपली मते मांडली.

**दि. १९ जानेवारी, २०१६ :** स्त्री-शक्ती प्रॉडक्शन निर्मित 'सोपानाची आई - बहिणाबाई ' हा चित्रपट दाखविण्यात आला.

**दि. २४ जानेवारी २०१६ :** 'मैत्रेयीचे २९ वे स्नेहसंमेलन' सकाळी ९.३० ते सायं. ६ या वेळेत संपन्न झाले. पुढीलप्रमाणे कार्यक्रम झाले. १) यावर्षीचा कै.सौ. प्रभावती पागे पुरस्कार मुलुंडमधील सुप्रसिद्ध भरतनाट्यम् नृत्यकलाभिज्ञ शारदा गणेशन यांना सुप्रसिद्ध कथ्थक नृत्यांगना रंजना फडके यांच्या हस्ते प्रदान केला गेला. पुरस्काराचे हे ९ वे वर्ष होते. यावेळी शारदा गणेशन यांच्या शिष्यवृंदाने भरतनाट्यमचे सादरीकरण केले. २) 'तिचं आकाश....' या कार्यक्रमात आशियातील पहिली मोटरवुमन सुरेखा यादव व गिर्यारोहक अपर्णा भट्ट यांची प्रियांका मोकाशी यांनी मुलाखत घेतली.३) 'यमनरंग' या कार्यक्रमात शभा केळकर आणि सहकारी यांनी यमन रागातील अजरामर हिंदी-मराठी गीते सादर केली. ४) 'बिंब - प्रतिबिंब' या कार्यक्रमात अभिनेत्री शुभांगी गोखले व सखी गोखले या मायलेकींची मुलाखत,'सह्याद्री वाहिनी' वरील सूत्रसंचालक रश्मी आभडेकर यांनी घेतली.



Ahval text16.indd 16 2/2/2019 4:46:55 PM

**दि. २ फेब्रुवारी, २०१६ :** ओ.पी.डी. नं. १७ या पुस्तकाच्या लेखिका विनिता चितळे यांची, अंजली कोनकर यांनी मुलाखत घेतली. मेडिकल सोशल वर्क या क्षेत्रातील त्यांचे अनुभव थक्क करणारे होते.

**दि. १६ फेब्रुवारी, २०१६ :** लोकप्रिय कवयित्री संजीवनी मराठे यांच्या जन्मशताब्दीच्या सांगतेप्रीत्यर्थ ‘कविता संजीवनी’ या संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन केले होते. लेखन सुषमा पाटणकर यांचे होते. कार्यक्रमात सुषमा पाटणकर, माधवी भुसारी, सुरेखा जोशी, विजया फाटक या सहभागी झाल्या होत्या.

**दि. १ मार्च, २०१६ :** मैत्रिणींसाठी अभिवाचन आयोजित केले होते. कविता, कथा, ललितलेखन, नाट्यप्रवेश अशा विविध साहित्यप्रकारांचे मैत्रिणींनी अभिवाचन केले.

**दि. १५ मार्च, २०१६ :** महिलादिनानिमित्त विशेष कार्यक्रम आयोजित केला होता. सुरवातीला ‘महाराष्ट्र टाइम्स’ने दि. १३ मार्च रोजी आयोजित केलेल्या ‘बाईक रॅली’मध्ये सहभागी झालेल्या मैत्रेयी समिती सदस्य रजनी करंदीकर यांनी त्यांचे अनुभव सांगितले. त्यानंतर ‘शून्यातून व्यवसायाकडे’ या कार्यक्रमांतर्गत सोलापूरहून आलेल्या सुलोचना भाकरे यांनी अनुभवकथन केले. त्यांचे अनुभव थक्क करणारे व इतरांना प्रेरणा देणारे होते.

**दि. ५ एप्रिल, २०१६ :** ‘वसा एकलव्याचा’ या कार्यक्रमांतर्गत यमगरवाडी येथील भटक्या विमुक्तांसाठी काम करणाऱ्या एकलव्य आश्रम शाळेतील समाजसेविका सुशील ओक यांच्याशी त्यांची बहीण वीणाताई नाटेकर यांनी संवाद साधला. त्यांचे पती श्री. रघुवीर ओक यांनीही मेघालय येथील अनुभव सांगितले.

**दि. २६ एप्रिल, २०१६ :** यावर्षीच्या वासंतिक मेळाव्यानिमित्त ‘सेल्फी’ या नाटकाचा प्रयोग आयोजित केला होता. ‘असीम एन्टरटेनमेंट’ निर्मित या नाटकाच्या लेखिका होत्या शिल्पा नवलकर व दिग्दर्शक होते श्री. अजित भुरे. या नाटकातील कलाकार होते सुकन्या कुलकर्णी, शिल्पा नवलकर, सोनाली पंडित, पूर्वा गोखले व ऋजुता देशमुख. नाटकाला उत्तम प्रतिसाद मिळाला.

‘कल्पना विहार’ महिला मंडळातर्फे सर्व महिला मंडळांसाठी खाद्यपदार्थ स्पर्धा आयोजित केली होती. त्यामध्ये डाळीचा कुठलाही गोड किंवा तिखट पदार्थ तयार करावयाचा होता. त्यामध्ये मैत्रेयीच्या रजनी करंदीकर यांना गोड पदार्थ या विभागात पहिले पारितोषिक मिळाले.

चित्तपावन ब्राह्मण संघातर्फे ‘चैत्रगौरीची आरास’ ही स्पर्धा दि. १६ एप्रिल, २०१६ रोजी आयोजित केली होती. यामध्ये पाणी या विषयावर आरास करावयाची होती.या स्पर्धेत मैत्रेयीला प्रथम पारितोषिक मिळाले. स्पर्धेत मैत्रेयीतर्फे अर्चना कामत, रश्मी अनगळ, नंदिनी हंबर्डे, वीणा नाटेकर व मेधा देव यांनी सहभाग घेतला.

प्रियांका मोकाशी, कार्यवाह — माधवी भुसारी, अध्यक्ष

## कला विभाग



र. द. लाड - (अध्यक्ष), वि.म.सौदागर (कार्यवाह)

सदस्य - चं.म. कुलकर्णी, प्रदीप नाटेकर, द.व. कुलकर्णी, अ.मो.भंडारे, स. श्री. पाटणकर, प्रकाश सडेकर, मेधा दिवेकर, सीमा केतकर, मुग्धा गोळे, श्रेयसी वझे-मंत्रवादी. सुषमा पाटणकर

अहवाल वर्षात कलाविभागातर्फे अगदी मोजकेच परंतु दर्जेदार कार्यक्रम सादर करण्यात आले:-

**दिनांक २८.०५.२०१५** रोजी स्वातंत्र्यवीर सावरकर व आपली धर्मनिरपेक्षता ह्या विषयावर डॉ. विष्णू वामन देशपांडे यांचे व्याख्यान.

**दिनांक १४.०६.२०१५** रोजी कै. सौ. सुविधा शंकर गोखले स्मृतीप्रीत्यर्थ डॉ. ज्योती काळे यांचे शास्त्रीय गायन.

**दिनांक २४.०७.२०१५** - पोवाडे, लोकगीत यावर आधारित कार्यक्रम ‘शाहिरी फुलोरा’, संकल्पना व सादरकर्ते - डॉ. प्रकाश खांडगे, सहभाग - डॉ. गणेश चंदनशिवे आणि शाहीर सुरेश जाधव व इतर.

**दिनांक ०१.०८.२०१५** - वारी पंढरीची, सूत्रसंचालन - सौ. सुलभा केळकर. गायक - कौस्तुभ मुळे व सौ. श्रृती पाध्ये.
तबला - आदित्य पानवलकर. संवादिनी - सुशील गद्रे.

**दिनांक ७ व ८ ऑगस्ट २०१५** - कै. गंगाबाई महाबळ स्मृती प्रीत्यर्थ ‘संतांचे बोल’, प्रसिद्ध निरुपणकार सौ. धनश्री लेले.
विषय :- सांगे कबीर (०७.०८.२०१५), नामदेवाची अमृतवाणी (०८.०८.२०१५)
दोन्ही दिवसांच्या व्याख्यानांना रसिक श्रोत्यांचा अलोट गर्दीने प्रतिसाद लाभला.




Ahval text16.indd 17 2/2/2019 4:46:55 PM

**दिनांक १४ ऑगस्ट २०१५ -** 'एक कलाकार - एक संध्याकाळ' या कार्यक्रमांतर्गत ज्येष्ठ अभिनेते श्री. जयंत सावरकर यांचा सन्मान. या कार्यक्रमानंतर संस्थेचे माजी विश्वस्त व कला विभागाचे संस्थापक सदस्य श्री. वसंत उर्फ दादा केतकर यांच्या कसदार लेखणीतून उतरलेल्या 'गीत कृष्णायन' या गीत संग्रहाचे प्रकाशन.
**दिनांक ८,९ व १० ऑगस्ट २०१५** - कै. लक्ष्मणराव महाबळ पितृस्मृती व्याख्यानमाला.
विषय - गीतेचे आद्य भाष्यकार , आद्य शंकराचार्य, संत ज्ञानेश्वर, लोकमान्य टिळक
**दि. १६ फेब्रुवारी,२०१६ -** ज्येष्ठ प्रकाशक श्री. रामदास भटकळ यांच्या शास्त्रीय गायनाची (बंदिशींची) मैफल. तबला साथ : ओंकार गुलवडी, संवादिनीसाथ - सिद्धेश बिचोलकर. या कार्यक्रमात श्री. भटकळ यांनी पं. दिनकर कायकेणी यांच्या बंदिशी सादर केल्या.

विनोद सौदागर, कार्यवाह रवींद्र लाड, अध्यक्ष

## संगीत महोत्सव



संस्थेच्या वतीने आत्तापर्यंत चार 'स्वरझंकार महोत्सव 'आजवर संपन्न झाले होते. अभिजनांचा उत्तम प्रतिसाद लाभल्यामुळे यंदाही ५ वा 'संगीत महोत्सव' साजरा झाला. कार्यक्रमाचा तपशील खालीलप्रमाणे:
शनिवार, दि.६ फेब्रुवारी २०१६ - पं. जयतीर्थ मेवुंडी (गायन) व तारा कन्नन (गायन)
रविवार, दि.७ फेब्रुवारी २०१६ - आदित्य मोडक (गायन) व पं. नयन घोष (सतार) व विदुषी देवकी पंडीत (गायन)
या कार्यक्रमाला 'वास्तव ग्रुप' चे प्रायोजकत्व लाभले होते.

## महाराष्ट्रातील गिर्यारोहकांचे १४ वे गिरिमित्र संमेलन



यंदाचे गिरिमित्र संमेलन दि. ११ व १२ जुलै २०१५ रोजी झोकात पार पडले. या संमेलनाची मध्यवर्ती संकल्पना होती - दुर्ग संवर्धन.
सहयाद्रीच्या डोंगर रांगांत भटकणारे डोंगरवेडे आपआपल्या परीने गेली ४० वर्षे संवर्धनाची अनेक कामे करत असतात. टाके सफाई, वास्तुंची सफाई, गडवाटांची सफाई, वृक्षारोपण अशा अनेक कामांचा त्यामध्ये सहभाग असतो, हे काम ऐतिहासिक प्रेमापोटी, व सामाजिक बांधिलकी पोटी होत असते. तरी हे सारे करीत असता, पुरातत्वाची हाताळणी, नियम, संकेत माहीत नसतात, याकरिता शासनाबरोबरच्या अधिकाऱ्यांची - पुरातत्व इतिहासकारांची - या कामाबाबत माहिती करून घेणे. दुर्गप्रेमींच्या कामाला प्रोत्साहन देणे, पुरातत्त्वीय दृष्टिकोन विकसित करणे, म्हणून नियम, अटी, समजून शासकीय कामात दुर्गप्रेमीना कसे सहभागी होता येईल, याकरीता एक विचारमंथनाचा विषय निवडला होता तो म्हणजे - सह्याद्रीतील दुर्ग संवर्धन!
याकरिता
१. पुरातन वास्तुविषयक दृष्टिकोन - मार्गदर्शक होते, श्री. कुरुष दलाल - सहप्राध्यापक - बहि:शाल शिक्षण केंद्र मुंबई विद्यापीठ.
२. उत्खनन - श्री. अभिजीत दांडेकर - सहप्राध्यापक, डेक्कन महाविद्यालय - पुणे.
३. पुरातत्व नियम व संकेत :- श्री. तेजस गर्गे - स. पुरातत्ववेत्ता, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, औरंगाबाद परिमंडळ.
४. गडावरील संवर्धनाची कामे साफसफाई इ. - श्री. मयुरेश ठाकरे, पुरातत्व व वस्तूसंग्रहालय संचालनालय महाराष्ट्र.
५. सुरुवात पुरातत्वीय शोधाची (लेणी) - श्री. विनायक परब, पुरातत्व अभ्यासक. कार्यकारी संपादक, लोकप्रभा.
६. संवर्धन व्यवस्थापन (बांधकाम) - श्री. चेतन रायकर, गडसंवर्धन व्यवस्थापक, मुंबई.
७. गड किल्ल्यांचे नकाशे - श्री. सचीन जोशी. स. प्राध्यापक डेक्कन कॉलेज पुणे, गड किल्ले संवर्धन.



Ahval text16.indd 18 2/2/2019 4:46:55 PM

**समिती - महाराष्ट्र राज्य.**
संमेलनाचे अध्यक्ष होते - डॉ. गो.बं. देगलूरकर सर.
कुलपती - डेक्कन महाविद्यालय - पुणे.
प्रमुख पाहुणे - डॉ. अरविंद जामखेडकर - माजी संचालक, पुरातत्वव वस्तुसंग्रहालय संचालनालय - महाराष्ट्र.
संमेलनाचे दीप प्रज्वलन - डॉ. विकास गुप्ता, संचालक. संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली यांच्या हस्ते झाले.


दरवर्षीप्रमाणे गिर्यारोहणातील संस्था सन्मान - कोल्हापूरच्या ‘निसर्गवेध परिवार’ आणि ‘युथ हॉस्टेल’ महाराष्ट्र राज्य शाखा या संस्थांचा करण्यात आला.

यंदाचे गिर्यारोहक आणि संस्थात्मक कार्य करणारे मानकरी ठरले. श्री. विनय हिंगोणीकर, डॉ. राहूल वारंगे, श्री. मुकेश मैसरी, श्री. यशवंत साधले, श्री. दत्ता फोपे, गिरिमित्र जीवन गौरव सन्मान इतिहास संशोधक श्री. निनाद बेडेकर यांना देण्यात आला. या प्रसंगी त्यांचे कुटुंबीय या प्रसंगी उपस्थित होते.

संमेलनात विजयी झालेल्या चार गिर्यारोहणाच्या चित्रफिती दाखविण्यात आल्या. त्यापैकी -
१. उत्तेजनार्थ - इंप्रिन्टस् - निसर्गमित्र.
२. तृतीय क्रमांक - सहयावलोकन भाग २ - अश्वमेध प्रतिष्ठान.
३. द्वितीय क्रमांक - ध्यासपर्व - शैलभ्रमर.
४. प्रथम क्रमांक - संडेवन - सह्याद्री ॲडव्हेंचर क्लब (सॅक) यासोबत दरवर्षीप्रमाणे नवोदितांची अभ्यासपूर्ण चित्रफिती सादर केल्या गेल्या, त्यात -
१. बाण क्लाइंबिंग - संस्था बाण हायकर्स.
२. पन्हाळगड ते पाली सायकलिंग - अमित मोने.
३. ऑन द टोज ॲन्ड द थंब - चक्रम हाइकर्स.
४. अजिंक्यवेध - गिरिमित्र प्रतिष्ठान.
५. द होली ट्रेल - गिरिविहार.
६. मकालू समिट - गिरिप्रेम (पुणे) आणि रस्सा ग्लेशियर - हिमालयन.

संमेलनात सालाबादप्रमाणे छायाचित्र स्पर्धा आणि त्यांचे प्रदर्शन, ट्रेकर ब्लॉगर स्पर्धा, पोस्टर स्पर्धा घेण्यात आल्या. संमेलनाची प्रमुख पदाची जबाबदारी ॲड. रवी परांजपे यांनी अनेक संस्थांच्या मदतीने यशस्वीपणे पार पाडली.

| | | |
|---|---|---|
| विनोद सौदागर | रवींद्र द. लाड. | अरुण भंडारे |
| कार्यवाह | अध्यक्ष - कला विभाग | सहकार्यवाह |



## ‘प्रेरणा पुरस्कार’ व ‘सॅल्यूट इंडिया’



महाराष्ट्र सेवा संघातर्फे प्रतिवर्षी समाजिक, साहित्यिक आणि कला क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाने एक वेगळी उंची गाठणाऱ्या,अत्युच्च योगदान देणाऱ्या मान्यवरांचा पुरस्कार देऊन गौरव केला जातो. या पुरस्कारांबरोबरच तरुण उद्योजक, वैज्ञानिक आणि साहित्याच्या क्षेत्रात कथा कादंबरी हे रूढ साहित्यप्रकार बाजूला ठेऊन वेगळया क्षेत्रात साहित्यनिर्मिती करणाऱ्या साहित्यिकांचा देखील संस्था सन्मान करते.

अर्थात साहित्य, कलासंस्कृती बहरते, फुलते ती खुल्या, मोकळया वातावरणात, शांतता काळातच! सीमेवरील आक्रमणे, निसर्गप्रकोप, दहशतवादी हल्ले, युद्धे, अंतर्गत दंगली यांनी हे शांत जीवन ढवळून निघते. आपल्या देशाच्या सुदैवाने देशाच्या सीमा आपल्या छातीची ढाल करुन, प्रसंगी प्राणार्पण करून लढणाऱ्या आपल्या सैन्यदलामुळे सुरक्षित आहेत. वादळे, महापूर, भूकंप या सारख्या नैसर्गिक आपत्तींमध्ये देखील आपली संरक्षणदले प्राण पणाला लावून काम करतात. ह्या जवानांमुळे, अधिकाऱ्यांमुळे आपण मोकळा श्वास घेऊ शकतो, आपले जीवन, देशाच्या सीमा सुरक्षित ठेवणाऱ्या संरक्षणदलातील वीरांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी, त्यांचा सन्मान करण्यासाठी काही न काही तरी करावे, असा विचार संस्थेने केला व या विचारमंथनातून ‘प्रेरणा पुरस्काराची’ निर्मिती झाली. या पुरस्काराला ’वैद्य पाटणकर काढा’ या आयुर्वेदिक औषधी उद्योगाचे श्री. विलास पाटणकर यांनी आर्थिक बळ दिले.

हा पहिला ’प्रेरणा पुरस्कार’ सोहळा शुक्रवार दि. २५ डिसेंबर २०१५ रोजी संपन्न झाला. या पुरस्काराचे मानकरी होते, ग्रुप कॅप्टन दिलीप परुळकर, व्ही.एस.एम. (निवृत्त) कमांडर रवींद्र पाठक आणि सुभेदार मेजर अशोक काशीद. ह्या वीरांबरोबरच मान्यवर इतिहास संशोधक अप्पा परब यांनाही संस्थेने सन्मानित केले. डी. शिवानंदन, माजी पोलीस महासंचालक, हे प्रमुख पाहुणे होते, ज्येष्ठ पत्रकार समीर कर्वे यांनी मान्यवरांशी संवाद साधला.

भारतीय सैन्यादलातल्या जवान आणि अधिकारी ह्यांच्या व्यथा; त्यांच्या भारतीय जनतेकडून असणाऱ्या अपेक्षा जाणून घ्यायच्या असतील तर एकटा ’प्रेरणा पुरस्कार’ पुरेसा नाही; त्यासाठी सातत्याने प्रयत्न करणाऱ्या समविचारी स्वयंसेवकांचे एक अभियान निर्माण करावे असे संस्थेच्या कार्यकर्त्यांच्या विचारमंथनातून ठरले आणि प्रेरणा पुरस्कारापासून प्रेरणा घेत, स्फूर्ती घेत ’सॅल्यूट इंडिया’ या एकजिनसी, समविचारी, कार्यकर्त्यांच्या ’सॅल्यूट इंडिया’ या म.से.सं. प्रणित अभियानाची निर्मिती झाली. या ग्रुपमध्ये संस्थेच्या कार्यकर्त्यांबरोबरच संस्थेबाहेरील समविचारी व्यक्ती निगडित आहेत.


अनुराधा प्रभुदेसाई या गेली अनेक वर्षे ’कारगील’ येथे तिथल्या अधिकारी आणि जवानांना भेटायला, त्यांना सदिच्छा देण्यासाठी सहली घेऊन जातात. त्यांचा ‘लक्ष्य फाउंडेशनचा’ ‘वीर मित्र’ हा कार्यक्रम ‘सॅल्यूट इंडियाने’ ७ मे २०१६ रोजी आयोजित केला होता, कार्यक्रमाला श्रोत्यांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. सॅल्यूट इंडियाचा हा पहिलाच कार्यक्रम . श्रोत्यांच्या उदंड प्रतिसादामुळे मिळालेल्या उर्जेने सॅल्यूट इंडियाला आपला दुसरा कार्यक्रम सादर करण्याची प्रेरणा मिळाली. म.टा.चे समीर कर्वे जे आपल्या ’प्रेरणा पुरस्कार आणि सॅल्यूट इंडियाचे’ मार्गदर्शक कार्यकर्ते आहेत, त्यांच्या प्रयत्नामुळे ‘म.टा. संवाद’ अंतर्गत भारताची ‘सूर भरारी - पाणबुडी ते जी.पी. एस.’ हा अभिनव कार्यक्रम आपण सादर केला, तज्ञ वक्ते होते, कमांडर (निवृत्त) गिरीश कोनकर, ज्यांनी आपली पहिल्या भारतीय बनावटीच्या पाणबुडीबद्दल तसेच भारतीय नौदलातल्या ‘पाणबुडयांबद्दल’ सोप्या भाषेत माहिती दिली, यानंतर नाविक जी.पी.एस्. बद्दल टी.आय.एफ.आर.चे तज्ञ डॉ. मयांक वाहिया आणि डॉ. अनिकेत सुळे यांनी माहिती सांगितली . याही कार्यक्रमाला श्रोत्यांचा उदंड प्रतिसाद मिळाला.

सॅल्यूट इंडिया अभियाना अंतर्गत सप्टेंबर अखेरीस युद्धनौकांच्या प्रतिकृती आणि सुरक्षा दलांची अभ्यासपूर्ण माहितीपत्रके व चित्रपट सादर करण्यात येतील. आरमारदलाच्या बँडच्या कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात येत आहे.



Ahval text16.indd 20 2/2/2019 4:46:55 PM

# अर्थ विभाग



अजित ग. करंदीकर (अध्यक्ष), अ. पं. गोळे (कार्यवाह)
सदस्य - अमिता ठोसर, प्रकाश सडेकर ,विजय वा.वझे, अरुण भंडारे

महाराष्ट्र सेवा संघाच्या अर्थविभागाद्वारे आर्थिक, कायदा व व्यवस्थापन या विषयांवर अर्थप्रबोधन व्याख्यानमालेत कार्यक्रम सादर केले जातात मागील वर्षी खालील कार्यक्रम सादर करण्यात आले.

**दि. १९.०४.२०१५** रोजी 'अर्थ नियोजन व चुकीच्या गुंतवणुकीपासून सावधान' या विषयावर श्री. चंद्रशेखर पुरोहित यांच्या व्याख्यानाचा कार्यक्रम झाला, श्रोत्यांनी कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन आपल्या शंकांचे निराकरण करून घेतले.
**दि. २८.०६.२०१५** रोजी सी.ए. संजीव गोखले यांचे 'तरतुदी आयकराच्या - कटकटी विवरणपत्राच्या' या विषयावर भाषण झाले. श्री. गोखले यांनी आयकर सूट मिळण्याकरिताच्या गुंतवणुकी व विवरणपत्र सादर करण्याबाबत अतिशय मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमास श्रोत्यांची उपस्थिती भरपूर होती.
**दि. २६ जुलै २०१५** रोजी 'की टू ऑप्शन्स ॲंड फ्युचर्स' या विषयावर श्री. अनिरुद्ध जोशी यांचे भाषण झाले. या नवीन गुंतवणूकीबद्दलचे श्री. जोशी यांचे मार्गदर्शन खूपच उद्‌बोधक होते.
**दि. २३ ऑगस्ट २०१५** रोजी 'माणसं लहान कार्य महान' या विषयावर डॉ. पवन अग्रवाल यांच्या भाषणाचा कार्यक्रम झाला. मुंबईचे डबेवाले व वर्तमानपत्र विक्रेत्यांविषयी हा कार्यक्रम खूपच छान झाला.
**दि. २५ ऑक्टोबर २०१५** रोजी 'संरक्षण दलाचे अर्थकारण' या विषयावर कॅ. शशिकांत कोप्पीकर यांचे भाषण झाले. संरक्षण दलाकरिता होणारी अर्थसंकल्पामधील तरतूद तसेच इतर देशांच्या तुलनेत भारतामध्ये होणारी अर्थसंकल्पामधील तरतूद याविषयी अत्यंत मौलिक माहिती दिली.
**दि. २०.१२.२०१५** रोजी श्री. कौस्तुभ कुलकर्णी यांनी 'आर्थिक पत्रकारिता' या विषयावर अत्यंत सुंदर भाषण केले. विषय कठीण असूनही श्री. कुलकर्णी यांनी सोप्या भाषेत विशद करून सांगितला.
**दि. २७.०३.२०१६** रोजी 'जाणून घेऊया या अर्थसंकल्प -२०१६-१७' या कार्यक्रमात डॉ. सुनीती नागपूरकर यांनी अर्थसंकल्पाचे विश्लेषण व तो तयार करण्याची पद्धत याबाबत माहिती दिली तर संजीव गोखले यांनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रम खूपच रंगतदार झाला व श्रोते भारावून गेले.

अर्थप्रबोधन व्याख्यानमालेशिवाय विभागातर्फे सप्टेंबर २०१५ मध्ये डॉ. अभिजित फडणीस यांनी 'शेअर्समधील गुंतवणूक' याविषयी ३ दिवस कार्यशाळा घेतली. श्रोते अत्यंत उत्साहाने कार्यक्रमात सहभागी झाले होते. कार्यक्रमास शुल्क असूनही उपस्थिती लक्षणीय होती. कार्यशाळेमुळे गुंतवणुकीबद्दल काय सावधानता बाळगावी यांचे ज्ञान मिळाल्याची श्रोत्यांची प्रतिक्रिया होती.

तसेच, नोव्हेंबर २०१५ मधील श्री. सुनिल बर्वे यांनी 'बॅलन्सशीट ॲनालिसीस, शेअर्सच्या भावामध्ये होणारे चढउतार' या गोष्टी आलेखाद्वारे समजावून सांगितल्या तसेच याबाबत मिळणाऱ्या निरनिराळया सॉफ्टवेअर्स बाबतही मार्गदर्शन केले.

**दि. २०.०२.२०१६** रोजी 'गणेश केशव करंदीकर उद्योजक सन्मान पुरस्कार' सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावर्षीचे सन्मानमूर्ती - श्री. दीपक जाधव, पूर्णिमा ओक व श्री. हेमंत भिडे हे होते. कार्यक्रम अतिशय सुंदर झाला. सर्व सत्कारमूर्तींनी मुलाखतीमध्ये आपआपल्या व्यवसायामधील अनुभव कथन केले व आपले मनोगतही केले.

अवधूत गोळे (कार्यवाह) अजित करंदीकर(अध्यक्ष)



Ahval text16.indd 21 2/2/2019 4:46:55 PM

# साहित्य सम्राट न.चिं. केळकर ग्रंथालय

नंदिनी हंबर्डे -अध्यक्ष, सुषमा पाटणकर– कार्यवाह, अ. मो. भंडारे - सहकार्यवाह
कार्यकारी सभासद-द.व.कुलकर्णी, र.द.लाड,स.ग.पोतदार,वि.म.सौदागर,सुनिता देवधर,सुहास कराडकर,मेधा देव, रश्मी अनगळ.

स्थापना १ मे १९७९
भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार प्राप्त ''अ'' वर्ग ग्रंथालय

साहित्य सम्राट न.चिं.केळकर ग्रंथालय म्हणजे-
अपूर्वो ज्ञानभंडारो मातर्भारती वृश्यते ।
व्ययते वृध्दिमायाति क्षयमायाति संचयात।।

न.चिं.केळकर ग्रंथालय हे सरस्वतीचे ज्ञानभंडार आहे. हे माते सरस्वती, तुझ्या भवनातील हे ज्ञानभंडार अपूर्व आहे.कारण त्याची रीत इतर भाण्डारापेक्षा वेगळी आहे.त्यातील ज्ञान खर्च केले तर ते वाढतच जाते आणि कुणालाही द्यायचे नाही म्हणून संभाळून ठेवले तर ते नष्ट होत जाते.

अशा या वृद्धिंगत होणाऱ्या ग्रंथालयाचा २०१५-१६ चा वार्षिक अहवाल सादर करताना कार्यकारी मंडळाला विशेष आनंद होत आहे.
१मे२०१६ रोजी ३७ वर्षे पूर्ण केलेले हे ग्रंथालय पूर्णपणे संगणकीकृत असे सुसज्ज ग्रंथालय आहे.अनेक संदर्भ आणि दुर्मीळ ग्रंथांचा ठेवा ग्रंथालयात उपलब्ध आहे.
वर्षभरात ग्रंथालयाने विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.
दि.२०/०४/२०१५ रोजी 'विशेष वाचकसंवाद' अंतर्गत घुमान येथे साहित्य संमेलनात उपस्थित राहिलेले सु.ना.पाटणकर ,मु.द.भुसारी, र.द.लाड, सुषमा पाटणकर यांनी साहित्य संमेलनातील आपले अनुभव सांगितले.
दि.२३ एप्रिल २०१५ रोजी 'जागतिक वाचक दिन' साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान नंदिनी हंबर्डे योनी भूषविले,तर प्रमुख पाहुणे म्हणून ज.र.बर्वे उपस्थित होते.
दि.३०/०४/२०१५ ते दि. ०३/०५/२०१५ रोजी न.चिं.केळकर ग्रंथालय, ग.क.खांडेकर ग्रंथालय वाचनालय आणि मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुलुंड शाखा या तिन्ही ग्रंथालयांच्या संयुक्त विद्यमाने 'वसंत व्याख्यानमाले'चे आयोजन करण्यात आले होते.त्यावेळी श्रीरामकृष्ण अघोर यांचे विनोदी कथांचे कथाकथन, श्री.मारुती यादव यांचे 'आनंदाची लयलूट' या विषयावर भाषण, श्री.लक्ष्मीकांत देशमुख याचे भारतीय प्रशासनातील आव्हाने आणि श्री.प्रकाश वाळवेकर / श्री.जयवंत दुखंडे यांचे भाषण 'वर्दीतील अनुभव' असे दर्जेदार कार्यक्रम सादर करण्यात आले.
दि.०३/०८/२०१५ रोजी भारतरत्न डॉ. ए. पी.जे.अब्दुल कलाम यांच्या दुःखद निधनाबद्दल श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.
दि.१३/०८/२०१५ रोजी मुलुंड येथील सर्व सांस्कृतिक व साहित्यिक संस्थांनी मिळून 'आचार्य अत्रे जयंती' साजरी केली.
दि.२८/०८/२०१५ रोजी सेतुमाधवराव पगडी स्मृति व्याख्यानमाला आयोजित केली होती. हे या व्याख्यानमालेचे ४थे वर्ष आहे.या व्याख्यानासाठी श्री.दुर्गेश परुळेकर यांना 'इतिहासाच्या पुनर्लेखनाची आवश्यकता ' या विषयावर व्याख्यानासाठी आमंत्रित केले होते.
दि.०२/१०/२०१५ रोजी 'सिटी ऑफ जॉय मुलुंड'या गृहसंकुलात ग्रंथालयाने 'ग्रंथालय तुमच्या दारी' या योजनेचे उद्घाटन केले. ह्या योजनेला अतिशय उत्तम प्रतिसाद मिळत असून २८ जणींनी ग्रंथालयाचे सभासदत्व घेतले आहे.
दि.१९/१०/२०१५ रोजी भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम यांची स्मृती सार्थ रीतीने जतन करण्यासाठी 'वाचन प्रेरणा दिन' साजरा केला गेला. सभासदांनी त्यांच्याविषयी आठवणी सांगितल्या आणि त्यांना आदरांजली वाहिली.
दि.३०/११/२०१५ रोजी वासंती गाडगीळ यांनी पुरस्कृत केलेला ''गंगाधर गाडगीळ स्मृती कार्यक्रम '' आयोजित केला होता.या कार्यक्रमाला डॉ.अरुण टिकेकर हे अध्यक्ष म्हणून लाभले होते.या कार्यक्रमाअंतर्गत श्री.विजय मोंडकर यांच्याशी विज्ञानकथा लेखक श्री.द.व.कुलकर्णी यांनी मनमोकळया गप्पा मारल्या.
दि.२६/१२/२०१५ रोजी डॉ.अरुण टिकेकर लिखित 'कालान्तर' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.या प्रकाशन सोहळ्याला प्रसिद्ध शल्य विशारद डॉ.रवी बापट प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.यावेळी विजय तापस, डॉ.अरुण टिकेकर,प्रतिभा गोपूजकर,

प्रदीप कुलकर्णी, प्रदीप चंपानेरकर हे मान्यवर उपस्थित होते.

दि.०४/०१/२०१६ रोजी कविश्रेष्ठ मंगेश पाडगावकर यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

दि.१८/०१/२०१६ रोजी 'रारंगढांग -एक दृकश्राव्य अनुभव' या विषयावर एक चित्रफीत दाखविण्यात आली.डॉ.वंदना बोकील कुलकर्णी यांनी भारतीय सैनिकांच्या जीवनावर ,त्यांच्या खडतर जीवनप्रवासाविषयी प्रोजेक्टरद्वारे अनुभव कथन केले.

दि.२५/०१/२०१६ रोजी ग्रंथालयाचे सभासद श्री.अनंत जोशी ह्यांनी पिंपरी चिंचवड येथे भरलेल्या ८९ व्या साहित्य संमेलनातील अनुभव कथन व काव्यवाचन केले.

दि १३/०२/२०१६ रोजी 'पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर' यांच्या जीवनावर आधारित 'ती एक अहिल्या होती' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.यावेळी डॉ.अरुणचंद्र पाठक आणि रत्नाताई चौधरी यांची विशेष उपस्थिती होती.

दि.२७/०२/२०१६ रोजी ''मराठी भाषा दिन '' साजरा केला.यावेळी संस्थेचे अध्यक्ष श्री.चं.ना.वझे यांनी मराठी भाषेविषयी उदबोधक व्याख्यान दिले.

दि.०८/०३/२०१६ ते १०/०३/२०१६ रोजी पॉप्युलर प्रकाशन आणि न.चिं.केळकर ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने प्रिय रसिक (वर्ष ६वे) हा साहित्यिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी 'तिची कहाणी-पुस्तकाच्या अभिवाचनात', यात डॉ.अरुणा दुभाषी आणि प्रज्ञा पवार यांचा सहभाग होता.

पुष्प २ रे मध्ये सुप्रसिद्ध लेखक श्याम मनोहर यांची चंद्रकांत कुलकर्णी आणि डॉ.अरुणा दुभाषी यांनी मुलाखत घेतली.

पुष्प ३रे मध्ये वसंत कानेटकर यांच्या नाटकातील उताऱ्यांच्या वाचनाचा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. हा कार्यक्रम सुप्रसिद्ध अभिनेत्री फैयाज,अभिनेता प्रमोद पवार,मोहन साटम आणि अस्मिता मोहिते यांनी सादर केला.

दि.१९/०३/२०१६ रोजी 'साहित्य साधना पुरस्कार' वर्ष ११ वे. हा न.चिं.केळकर ग्रंथालयाचा मानाचा पुरस्कार! 'मॅगझिनीतून सुटतेय गोळी' कवयित्री बालिका ज्ञानदेव आणि 'धूसर झालं नसतं गाव' चे कवी रवींद्र कोरडे या दोघांना देण्यात आला.या पुरस्कार सोहळ्याला अध्यक्ष म्हणून ज्येष्ठ साहित्यिक श्री.सतिश काळसेकर यांना आमंत्रित करण्यात आले होते.

दि १/०३/२०१६ रोजी 'विशेष वाचकसंवाद' अंतर्गत 'गुरुत्वाकर्षण' या विषयी ग्रंथालयाचे सभासद श्री.मधुसुदन जेऊरकर यांनी प्रोजेक्टरव्दारे माहिती दिली.हे अतिशय माहितीपूर्ण असे व्याख्यान झाले.

अहवाल वर्षात शासकीय जिल्हा ग्रंथालयाने दि.०४/०२/२०१६ ते ०६/०२/२०१६ रोजी ग्रंथदिंडी काढली होती.हा कार्यक्रम महाराष्ट्र सेवा संघाच्या सभागृहात मोठया उत्साहात साजरा करण्यात आला.शासकीय जिल्हा ग्रंथालय ते महाराष्ट्र सेवा संघ या दरम्यान ग्रंथदिंडी निघाली होती.शालेय विद्यार्थ्यांनी लेझीम हा खेळ खेळत दिंडीची शोभा वाढविली. अध्यक्ष श्री.चं.ना.वझे आणि कार्यवाह श्री.ज.र.बर्वे यांनी ग्रंथदिंडी वाहून आणली.संस्थेच्या प्रवेशद्वारात फुले उधळून ग्रंथदिंडीचे स्वागत करण्यात आले.

अहवाल वर्षात ग्रंथालयाचे सभासद श्री.सुजन शिपूरकर यांनी रु.५०००/- देणगी ग्रंथखरेदीसाठी दिली.तसेच निशा केळकर यांच्या स्मरणार्थ रु.८०००/- आणि गोरे काका यांच्या देणगीमधून रु.५०००/-ची पुस्तके खरेदी केली. न.चिं.केळकर ग्रंथालय या देणगीदारांचे आभार मानत आहे.

महाराष्ट्र सेवा संघाच्या विश्वस्त , कार्यकारी मंडळ, सभासद आणि ग्रंथालयाच्या वाचकांकडून व कर्मचाऱ्यांकडून मिळालेल्या सहकार्याबद्दल आम्ही कृतज्ञ आहोत!

| | |
|---|---|
| सुषमा पाटणकर | नंदिनी हंबर्डे |
| कार्यवाह | अध्यक्ष |

## ज्ञानेश्वर पुस्तक पेढी अहवाल-२०१५/२०१६

सन २०१५/१६ मध्ये इयत्ता १०वी चे एकूण ३० विद्यार्थ्यांनी पुस्तके नेली.त्यातले १४ विद्यार्थी नवीन व १६ विद्यार्थी जुने अशी एकूण ३० विद्यार्थ्यांनी पुस्तके नेली. या विद्यार्थ्यांना मागील पुस्तके पुरेशी असल्यामुळे पुस्तकांची खरेदी करण्यात आली नाही.

| | |
|---|---|
| प्रदीप वाईकर, उमेश काणेकर ,सेवक | अलका चौधरी, ग्रंथपाल |



Ahval text16.indd 23 2/2/2019 4:46:56 PM

## साहित्य सम्राट न. चिं. केळकर ग्रंथालय - ग्रंथस्थिती

| वर्षातील नवीन ग्रंथ खरेदी | वर्षात देणगी दाखल मिळालेले ग्रंथ | एकूण |
|---|---|---|
| ४०७ | ३२४ | ७३१ |

३१-३-२०१६ रोजी उपलब्ध ग्रंथ - ३४,८५०

अहवाल वर्षात ९०,०९३/- रुपये किमतीची ग्रंथखरेदी करण्यात आली.

### ग्रंथालय सभासद तपशील

| **३१-३-२०१६ अखेर सभासद** | विशेष सभासद | बाल विभाग | ग्रंथ विभाग |
|---|---|---|---|
| | १६६ | ३८ | ५४० |
| अंक विभाग | सन्माननीय सदस्य | सिटी ऑफ जॉय | एकूण सदस्य |
| १८६ | १ | २२ | ९५३ |

### ग्रंथालयात दरमहा येणाऱ्या अंक, मासिके व साप्ताहिके यांचा तपशील

| प्रकार | मासिके | त्रैमासिके | पाक्षिके | साप्ताहिके | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| मराठी | ६७ | १४ | १ | ११ | ९३ |
| हिंदी | ८ | - | ४ | - | १२ |
| इंग्रजी | ३१ | - | ८ | १२ | ५१ |
| एकूण | १०६ | १४ | १३ | २३ | १५६ |

### दिवाळी अंक योजना २०१५-२०१६

| | |
|---|---|
| सभासद संख्या | २३४ |
| अंकाचे प्रकार | ११५ |
| अंकांच्या एकूण प्रती | २८४ |
| खरेदी किंमत रुपये | २८,०४३/- |

### मोफत वाचनालयासाठी घेण्यात येणारी वृत्तपत्रे

| प्रकार | संख्या | नाव |
|---|---|---|
| मराठी | १२ | महाराष्ट्र टाईम्स, लोकसत्ता, नवशक्ती, नवाकाळ, सकाळ, सामना, लोकमत, रत्नागिरी टाईम्स, सनातन प्रभात, प्रहार, पुढारी, मी मराठी |
| हिंदी | २ | नवभारत टाईम्स, नवभारत |
| इंग्रजी | ७ | टाईम्स ऑफ इंडिया, इंडियन एक्सप्रेस, फ्री प्रेस जर्नल, इकॉनॉमिक टाईम्स, एशियन एज, हिंदुस्थान टाईम्स, डी.एन्. ए. |
| गुजराथी | २ | मुंबई समाचार, गुजराथी समाचार |

### सायंदैनिके

| प्रकार | संख्या | नाव |
|---|---|---|
| मराठी | २ | महानगर, संध्यानंद |
| हिंदी | १ | सामना |
| इंग्रजी | २ | आफ्टरनून, मिड-डे |

# दृष्टिसेवा अभ्यासिका

अध्यक्ष - सुनीता देवधर, कार्यवाह - रश्मी अनगळ

सभासद - नंदिनी हंबर्डे, प्रियांका मोकाशी, विनोद सौदागर, श्री. सदाशिव पोतदार, श्री. द.व. कुलकर्णी

दृष्टिसेवा विभागाचे २०१५-१६ हे चवथे शैक्षणिक वर्ष ! १२ जून २०१५ रोजी हया शैक्षणिक वर्षासाठी, विद्यार्थी व पालक यांच्या मुलाखती घेण्यात आल्या. प्रवेश देण्याआधी विदयार्थ्यांच्या पालकांकडून, ते दृष्टीसेवा, महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड येथे आपल्या पाल्यांना स्वतःच्या जबाबदारीवर पाठवीत असल्याचे संमतिपत्र लिहून घेण्यात आले. प्रवेशप्रक्रिया पूर्ण होऊन १५ जून २०१५ रोजी या शैक्षणिक वर्षाची सुरुवात झाली. सुरुवातीला २९ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला.

मार्च २०१५ मध्ये झालेल्या शालान्त परीक्षेचा निकाल १०० टक्के लागला होता. या यशस्वी विद्यार्थ्यांचा, त्यांच्या शिक्षकांचा व लेखनिकांचा सत्कार, हा या वर्षातला पहिला कार्यक्रम. मुलुंडमधील विख्यात डॉक्टर श्रद्धा उपासनी यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला. २५ ऑगस्ट २०१५ रोजी NAB च्या Rehabilitation विभागातर्फे विद्यार्थ्यांना MP3 चे वाटप करण्यात आले.

७ सप्टेंबर २०१५ ला अपना बाजारच्या सहभागाने होणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्यात दृष्टिसेवेच्या २० विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांनी समूहगीत सादर करुन उपस्थितांची वाहवा मिळवली.

यंदाच्या वर्षातील सर्वात उल्लेखनीय बाब म्हणजे दृष्टिसेवेच्या विद्यार्थ्यांना शालांत परीक्षेसाठी मुलुंड विद्यामंदिर ही शाळा केंद्र म्हणून मिळवून देण्यात आलेले यश.

या वर्षीची विद्यार्थ्यांची सहलही वैशिष्टयपूर्ण ठरली. कलाकार श्री. चिंतामणी हसबनीस यांनी अंधांनाही अनुभवता येईल असे एक अनोखे चित्रप्रदर्शन वरळीच्या नेहरु कला दालनात भरविले होते. ५ ऑक्टोबर २०१५ रोजी दृष्टीसेवेच्या २९ विद्यार्थ्यांना हे प्रदर्शन बघण्यासाठी नेण्यात आले. 'क्लोज्ड आइज अँड ओपन माईंडस्' हया अनोख्या प्रदर्शनात ब्रेल लिपीचा वापर, स्पर्शाला जाणवणाऱ्या रेषा व ऑडिओच्या माध्यमातून चित्रांशेजारी मांडलेल्या हेडफोन्स मधून अंधापर्यंत पोहोचणारी चित्रभाषा होती. दृष्टीसेवेच्या केवळ अल्पदृष्टी नाही तर शून्यदृष्टी विद्यार्थ्यांनीही हे प्रदर्शन अनुभवले. नंतर मुलांना गेट वे ला नेऊन बोटिंग करताना पाण्याचा स्पर्श, अंगावर उडणाऱ्या जलबिंदूंचा स्पर्श, अशा अनुभवांचा आनंद दिला.

६ नोव्हेबर २०१५ ला विदयार्थ्यांसाठी दिवाळी पार्टीचे आयोजन केले. विद्यार्थ्यांसाठी मिळालेले नवीन कपडे व फराळाचे पदार्थ तसेच मोती साबण विद्यार्थ्यांना दिवाळी भेट म्हणून दिले. विद्यार्थ्यांनी गाणी, चुटके वगैरे सादर करून, पार्टीत रंग भरला.

दिवाळी सुटीनंतर दुसऱ्या सत्रात अभ्यासावर जास्त लक्ष केंद्रित केले. दुसऱ्या सत्रात विद्यार्थ्यांची सराव परीक्षा घेतली. पूर्वपरीक्षेसाठी तसेच शालान्त परीक्षेसाठी मुलुंड विद्यामंदिरने आपल्या विद्यार्थ्यांना रायटरच्या कामासाठी नेमून मोलाची मदत केली. यंदा विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी साबण व अपमार्जिके हा विषय घेतला होता. द्रव, पावडर इ. रूपातील साबण बनविण्याचे तंत्र जाणून घेण्यासाठी विद्यार्थ्यांना कळवा येथील पितांबरी उत्पादनांच्या फॅक्टरीत नेण्यात आले होते. एस्.एस्.सी. बोर्डाच्या गृहशास्त्र व साबण व अपमार्जिके या दोन विषयांची शालान्त परीक्षा आपल्या केंद्रात घेण्यात आली. गेल्या तीन वर्षांप्रमाणेच यंदाही दृष्टिसेवेला घवघवीत यशाची अपेक्षा आहे. दृष्टिसेवा केंद्र सर्व शिक्षक, मदतनीस व देणगीदार यांचे आभारी आहे. केंद्रावर असाच लोभ असावा ही विनंती.


रश्मी अनगळ , कार्यवाह

सुनीता देवधर, अध्यक्ष



Ahval text16.indd 25 2/2/2019 4:46:56 PM

## **विज्ञान विभाग** (विज्ञान प्रेमींचा मंच)


*विज्ञान*

अध्यक्ष - सतीश पाटणकर , कार्यवाह - नितीन देशपांडे
कार्यकारी सदस्य - अरुण भंडारे, सीमा केतकर, प्रकाश सडेकर
**विशेष सहभागी तरुण कार्यकर्ते** -
सचिन वझे, शील फडके, जाई कुलकर्णी, चिन्मय कमळे, चिन्मयी वझे, अनिरुद्ध शेवळे, आदित पाटणकर, आदित्य भाभे, तुषार भाबल, अक्षय झेंडे

---

**दि. २२.०७.२०१५** व्यवसाय मार्गदर्शन उपक्रम. मार्गदर्शक डॉ. सिद्धिविनायक बर्वे. विविध क्षेत्रातील मान्यवरांनी शाळा-महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना विज्ञानातील आणि विशेषतः संशोधनातील उपलब्ध करिअर पर्यायांविषयी मार्गदर्शन केले. उपस्थिती सुमारे ३५०.

**दि. १४.११.२०१५** मुंबईतील पहिली यशस्वी ह्रदय प्रत्यारोपण शस्त्रक्रिया नुकतीच पार पाडलेले डॉ. अन्वय मुळे आपले मुलुंडकर. ह्या शस्त्रक्रियेच्या पूर्वतयारीची आणि आयत्या वेळच्या धावपळीची अतिशय थरारक कथा. डॉ. मुळे ह्यांनी श्रोत्यांसमोर अक्षरशः जिवंत केली. अवयवदानाबद्दलही त्यांनी उपस्थितांचे उत्तम प्रबोधन केले.

**दि. १२.१२.२०१५** यंदाचे डॉ. शांतीस्वरुप भटनागर पुरस्कार विजेते डॉ. विदिता वैद्य आणि डॉ. मंदार देशमुख यांचा सत्कार डॉ. संजय देशमुख, कुलगुरु मुंबई विद्यापीठ, हयांच्या हस्ते करण्यात आला. दोघांनी आपापल्या क्षेत्रातील अद्ययावत संशोधनाविषयी प्रबोधन केले. नंतर श्रोत्यांनी अनेक प्रश्न विचारुन शंका समाधान करुन घेतले. अतिशय आगळा वेगळा कार्यक्रम उत्तमरीत्या संपन्न झाला.

**दि. २७.१२.२०१५** 'सापेक्षतावाद' ह्या सिद्धांत मांडणीच्या शताब्दी वर्षानिमित्त या विषयाचे तज्ज्ञ श्री. राजीव चिटणीस यांचे उत्कृष्ट व्याख्यान झाले. त्यांनी हा क्लिष्ट विषय संपूर्णपणे मराठीत परंतु अतिशय ओघवत्या शैलीत आणि तळमळीने मांडला.

**दि. २१.०३.२०१६** 'गुरुत्व लहरी' ह्या शंभर वर्षापूर्वी मांडल्या गेलेल्या संकल्पनेची प्रत्यक्ष प्रचिती प्रयोगातून सिद्ध नुकतीच झाली. ही संकल्पना आणि 'लायगो' ह्या विषयावर ग्रंथालय उपक्रम 'वाचक संवाद' अंतर्गत कार्यक्रम आयोजित केला होता. वक्ते होते श्री. जेजूरकर . त्यांनी केवळ छंद म्हणून अभ्यासपूर्वक हा विषय जोपासला आहे. अतिशय सोप्या भाषेत त्यांनी संपूर्ण मराठीत हा विषय मांडला.

**दि. २६.०२.२०१६ आणि २७.०२.२०१६** 'राष्ट्रीय विज्ञान दिना'निमित्त आंतरशालेय विज्ञान प्रश्न मंजूषेचा कार्यक्रम आयोजित केला होता. हया प्रश्न मंजूषेच्या कार्यक्रमामध्ये मुलुंड, भांडुप, ठाणे यांबरोबरच विरार, वांगणी अशा दूरच्या आणि ग्रामीण भागातील शाळांनीही भाग घेतला होता. सगळया विदयार्थ्यांनी हया प्रश्न मंजूषेच्या कार्यक्रमाचा खूप आनंद घेतला. चार फेऱ्यांमध्ये आयोजित केलेल्या ह्या 'दीर्घ स्पर्धा' कार्यक्रमाच्या संपूर्ण आयोजनात विज्ञान विभागाच्या तरुण कार्यकर्त्यांनी प्रचंड कष्ट घेतले आणि हे शिवधनुष्य हसत खेळत पेलले. सांघिक कामाचा हा अत्यंत उत्तम नमुना होता.

**दि. ०७.०५.२०१६** Robotics Level १ कार्यशाळा आयोजित केली होती. वयोमर्यादा किमान १२ होती. १७ जणांचा सहभाग असलेल्या हया कार्यक्रमात आबालवृद्धांनी प्राथमिक स्वरूपाचा यंत्रमानव स्वतः बनवण्याचा आनंद घेतला. हा कार्यक्रमदेखील संपूर्णपणे तरुण कार्यकर्त्यांनी आखून यशस्वीपणे पार पाडला. Level २ साठी पुरेशी नोंदणी झाल्यास ११ जूनला पुढील कार्यशाळा आयोजित करण्याचा मानस आहे.

हया व्यतिरिक्त ३० जानेवारी २०१६ रोजी डॉ. मंदार देशमुख यांच्या हार्दिक निमंत्रणानुसार, विज्ञान विभागाच्या तरुण कार्यकर्त्यांनी TIFR संस्थेला भेट देऊन तेथील संशोधनाचा आवाका समजून घेतला.

नितीन देशपांडे , कार्यवाह सतीश पाटणकर, अध्यक्ष



Ahval text16.indd 26 2/2/2019 4:46:56 PM

# ऐरोली शाखा

डॉ. आनंद रा. कट्टी - अध्यक्ष , श्री. प्रदीप र. सप्रे - उपाध्यक्ष, श्री. शंकर गो. वीरकर - कार्यवाह, श्री. सुधीर वा. बागाईतकर - कोषाध्यक्ष,

**सदस्य :** श्री. चं. ना. वझे (पदसिद्ध), श्री. जयप्रकाश बर्वे (पदसिद्ध) , श्री. कि.म. पेंढरकर, श्री. मु. शं. बालंखे , श्री. वि. दा. जगताप, सौ. सुनीता देवधर, सौ. आरती सप्रे, सौ. दर्शना निमसे, श्री. निनाद जोशी, अनिल कुऱ्हेकर, सौ. प्रीती देशपांडे

अहवालवर्षी ऐरोली शाखेने १५व्या वर्षात पदार्पण केले. गेल्या १४ वर्षांत संस्थेची ही शाखा ऐरोलीमध्ये रुजली, नावारूपास आली, आणि विस्तारली. सकस व दर्जेदार कार्यक्रम, सामाजिक भान ठेवणारे सर्वसमावेशक उपक्रम, परिसरातील विद्यार्थ्यांना संस्थेशी जोडणारी अभ्यासिका ! संस्थेचं नातं सगळ्यांशी दृढ होत गेलं!

प्रतिवर्षीप्रमाणे वर्षभरातील कार्यक्रमांची सुरुवात वर्धापनदिनाच्या कार्यक्रमाने झाली. गेल्या वर्षी आयोजित केलेल्या, प्रतिभावंत गायिका आरती अंकलीकर यांच्या कार्यक्रमाला मिळालेला प्रतिसाद लक्षात घेऊन, यावर्षी अभिजात संगीतातील रसीलै व्यक्तिमत्त्व म्हणून ज्यांची ओळख आहे, अशा मंजूषा कुलकर्णी-पाटील यांच्या सुश्राव्य गायनाचा कार्यक्रम आयोजित केला होता आणि यालाही श्रोत्यांनी भरभरून प्रतिसाद दिला. पूर्ण लांबीच्या शास्त्रीय गायनाच्या कार्यक्रमाला लाभलेली श्रोत्यांची चांगली उपस्थिती, योग्य ठिकाणी मिळालेली दाद, कार्यक्रमाचे नेटकं आणि शिस्तबद्ध आयोजन यातून भारावलेल्या मंजूषाताईंनी संस्थेमध्ये परत येण्याची इच्छा प्रदर्शित केली.

१०वी व १२वी परीक्षांमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव व ज्येष्ठ शिक्षकांचा सत्कार हे कार्यक्रम नेहमीच्या दिमाखात सादर झाले. एकूण ४३ विद्यार्थी व १८ शिक्षकांना या कार्यक्रमामध्ये सन्मानित करण्यात आले. लोकमान्य टिळक अभियांत्रिकी महाविद्यालयाचे संचालक व माजी प्राचार्य डॉ. विवेक सुन्नपवार कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. शैक्षणिक गुणवत्तेच्या वाटेवरील नवीन आव्हानांचा वेध घेत, स्वतःच्या स्वप्नातील आकाश शोधण्यासाठी मनाची बैठक कशी असावी लागते, याबाबतीत छोटया, छोट्या गोष्टी सांगून त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांचे प्रबोधन केले.

दिवाळीच्या मंगल पहाटे वसंत प्रभू, वसंत देसाई व वसंत पवार या तीन दिग्गज संगीतकारांच्या रचनांवर आधारित 'ऋतु वसंत' हा संगीतमय कार्यक्रम सादर करण्यात आला. 'पंचमी' संस्थेच्या श्री. अभय कुलकर्णी व सहकाऱ्यांनी, अवीट गोडीच्या बहारदार गीतांमधून ही पहाट अधिकच मंगल केली.

ग्रंथालय, कला विभाग व मैत्री विभाग अत्यंत उत्साहात काम करत असून त्यांचे स्वतंत्र अहवाल जोडले आहेत. वर्षभरातील वेगवेगळ्या वैशिष्टयपूर्ण कार्यक्रमांमधून लोकरंजन आणि लोकशिक्षणाचे काम उत्तमप्रकारे पार पडत आहेत. ग्रंथालयात नव्याने सुरू करण्यात आलेल्या बालविभागाला छोट्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला आहे.

अभ्यासिका हा ऐरोलीशाखेचा एक विद्यार्थिप्रिय उपक्रम आहे. वेगवेगळया शाखांमध्ये उच्चशिक्षण घेणारे विद्यार्थी, कार्यालयांमध्ये उच्चपदासाठी परीक्षा देणारे कर्मचारी, तसेच सहकारी लोकसेवा व पोलीस दलावरील असंख्य विद्यार्थी अभ्यासिकेचा लाभ घेऊन प्रगती करत आहेत. शाखेच्या अभ्यासिकेमध्ये अभ्यास करुन , उत्तमप्रकारे शिक्षण पूर्ण करुन, चांगल्या कंपनीमध्ये नोकरी लागलेल्या खोले बंधूंनी अभ्यासिकेला भेटवस्तू दिल्या आहेत.

दरवर्षीप्रमाणे श्री अच्युत महाराज सत्संग मंडळाच्या संयुक्त विद्यमाने भागवत् सप्ताह साजरा करण्यात आला. प.पू. श्री. जितेंद्रनाथजी महाराज यांच्या मधुर वाणीतून सादर केला गेलेल्या प्रवचनांना लोकांचा उत्तम प्रतिसाद लाभला 'ऐरोली अवयवदान प्रसारक मंडळ' व परिसरातील इतर सेवाभावी संस्था या ऐरोली शाखेच्या कार्यात सहकार्य करीत आहेत.




Ahval text16.indd 27 2/2/2019 4:46:56 PM

वाढती स्पर्धा, लोकांची बदलती आवड, कालानुरूप बदल करण्याची गरज आणि संस्थेच्या इमारतीची सध्याची स्थिती लक्षात घेता, शाखेच्या इमारतीच्या नूतनीकरणाची गरज असून, २०१६-१७ या आर्थिक वर्षात याबाबतीत कार्यवाही करण्यात येईल.

संस्थेच्या मुख्य कार्यकारी मंडळाने वेळोवेळी केलेल्या योग्य मार्गदर्शनामुळे ऐरोली शाखेची वाटचाल संस्थेच्या घोषवाक्याला अनुसरून सुरू आहे. ऐरोली शाखेची व्यवस्थापन समिती सर्व कर्मचारी, कंत्राटदार तसेच इतर सर्व संबंधितांची आभारी आहे.
धन्यवाद !

शंकर वीरकर (कार्यवाह) डॉ. आनंद कट्टी (अध्यक्ष)

## कला विभाग - ऐरोली शाखा



श्री. किशोर म. पेंढरकर (अध्यक्ष), श्री. प्रदीप श्री. नाटेकर (उपाध्यक्ष) , श्री. मोरेश्वर गोखले,
श्री. सुधीर बागाईतकर

विनम्रतापूर्वक आम्ही वर्ष २०१५/१६ या कालावधीचा, कलाविभागाचा अहवाल सादर करीत आहोत.
केवळ करमणूक प्रधान कार्यक्रम न करता सामाजिक विषय आणि आशय हाताळणारे, प्रायोगिक, प्रबोधनात्मक, दर्जेदार व नवोदितांना प्रोत्साहन देणारे उत्तमोत्तम कार्यक्रम देण्याचा वर्षभरात प्रयत्न करण्यात आला.

या वर्षातील दोन महत्त्वाच्या घटना म्हणजे प्रभात चित्र मंडळ व महाराष्ट्र सेवा संघ यांच्या संयुक्त विद्यमाने दर महिन्याला एक राष्ट्रीय व विविध स्पर्धांमधील पारितोषिक प्राप्त चित्रपट दाखविण्याचा उपक्रम सुरू करण्यात आला. प्रेक्षकवर्ग निर्माण करण्यासाठी सध्या मराठी व हिन्दी चित्रपट दाखविण्यात येत आहेत व उपक्रम स्थिरावल्यावर जागतिक भाषेचे चित्रपट दाखविण्या्चा मानस आहे. चित्रपटानंतर त्या चित्रपटाविषयी चर्चात्मक परिसंवाद भरवला जातो व त्यास प्रेक्षकवर्गाचाही उत्तम प्रतिसाद मिळतो.

दुसरी महत्त्वाची घटना म्हणजे आपल्या संस्थेच्या एकपात्री अभिनय स्पर्धेचे हे दहावे वर्ष. सर्व वर्षी या स्पर्धेस उत्तम प्रतिसाद लाभला व दूरदूरच्या ठिकाणांवरूनसुद्धा स्पर्धकांनी सहभाग घेतला.

वर्षाची सुरुवात जीवनातील धकाधकीच्या व तणावपूर्ण जीवनशैलीमुळे निर्माण झालेल्या अस्थिरतेवर मात करण्यास उपयोगी ठरणाऱ्या आचार्य विनोबा भावे यांनी मांडलेल्या गीतेतील ‘स्थितप्रज्ञ दर्शन’ यावरील डॉ. राजीव कर्वे यांच्या विवेचनाने करण्यात आली.

प्रभात चित्रमंडळाच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रम सुरू करण्यापूर्वीच ‘एक हजाराची नोट’ हा अनेक पारितोषिक प्राप्त चित्रपट दाखविण्यात आला. चित्रपटानंतर निर्माते श्रीहरी साठे व लेखक श्रीकांत बोजेवार यांच्याशी चर्चा करण्याची संधी प्रेक्षकांना मिळाली व या संधीचा फायदा रसिक प्रेक्षकांनी घेतला.

सुप्रसिद्ध लोकशाहीर संभाजी भगत यांच्याशी मनमोकळ्या गप्पांद्वारे सुप्रसिद्ध लोककवी अरुण म्हात्रे यांनी शाहिरी व काव्य यांचा पट उलगडला. संभाजी भगत यांच्या सामाजिक जाणिवा किती प्रगल्भ आहेत हे त्यांच्याशी झालेल्या गप्पांमधून व त्यांच्या शाहिरी काव्यातून उमगले. प्रेक्षकांनी देखील या सुप्रसिद्ध कलाकाराशी मनमोकळा संवाद साधला.

एखाद दुसऱ्या देशाच्या अर्थव्यवस्थेवर झालेले विपरीत परिणाम जागतिकीकरणामुळे इतर सर्व देशांच्याही अर्थव्यवस्थेवर आघात करतात. ग्रीस व चीन या देशातील आर्थिक समस्येमुळे आपल्या देशातील शेअर बाजार, सोन्याची किंमत व दैनंदिन जीवनातील खर्चांवर झालेले परिणाम अतिशय अभ्यासपूर्ण पण सोप्या पद्धतीने सुप्रसिद्ध अर्थतज्ञ डॉ. सुनीती नागपूरकर यांनी उलगडून दाखविले. प्रेक्षकांनी भाषणानंतर चर्चेत उत्कटतेने भाग घेतला.

३५ वर्षांनंतर एका मराठी चित्रपटास बर्लिन फिल्म फेस्टिवलमध्ये आमंत्रण मिळाले. तो चित्रपट म्हणजे श्री. उमेश कुलकर्णी दिग्दर्शित व राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त चित्रपट 'विहीर'. प्रेक्षकांनी समरस होऊन या चित्रपटाचा आस्वाद घेतला.

दरवर्षीप्रमाणे यावर्षीदेखील पूर्ण चंद्रप्रकाशाच्या सान्निध्यात, आटीव दूध व अल्पोपाहारासह श्री. धनंजय जोशी यांच्या सुश्राव्य गायनाचा कोजागरी पौर्णिमेनिमित्त रसिक प्रेक्षकांनी मनमुराद आस्वाद घेतला.

जातीवादाच्या भेदक वास्तवावर आधारित राष्ट्रीय पुरस्कार विजेता श्री. श्याम बेनेगल दिग्दर्शित व श्री. किशोर कदम (सौमित्र) अभिनीत हिन्दी चित्रपट 'समर' दाखविण्यात आला. हिन्दी चित्रपटसृष्टीत समांतर चित्रपटांचा प्रवाह सशक्त करणाऱ्या श्याम बेनेगल यांनी या चित्रपटाद्वारे आजही शहरापासून खेड्यापर्यंत अस्तित्वात असणाऱ्या जातीयवादाचे चित्र अतिशय परखडपणे मांडले. चित्रपटानंतर प्रेक्षकांनी गांभीर्याने चर्चेत सहभाग घेतला.

मुंबई महानगरपालिका आदर्श शिक्षक महापौर पुरस्कार व उत्कृष्ट कथानिवेदक पुरस्कार प्राप्त सुप्रसिद्ध कवी व लेखक एकनाथ आव्हाड यांनी साध्या व सोप्या पद्धतीने कथा व कवितांमधून आजच्या जीवनावर भाष्य करीत प्रेक्षकांशी संवाद साधला.

मीरा नायर दिग्दर्शित ऑस्कर व इतर अनेक पुरस्कारांसाठी नामांकन प्राप्त चित्रपट 'सलाम बॉम्बे' हा दाखविण्यात आला. या चित्रपटात सुलभा देशपांडे, नाना पाटेकर व इरफान खान इत्यादी नामवंत कलाकारांच्या भूमिका होत्या. मुंबईतील वेश्यावस्ती व फूटपाथवर जगणाऱ्या मुलांच्या संघर्षपूर्ण व कष्टदायक जीवनाचे वास्तववादी दर्शन या चित्रपटात भेदकपणे करण्यात आले आहे.

श्रीमती श्रुती पाध्ये-कुलकर्णी यांनी शास्त्रीय, नाटयसंगीत व अभंग सादर करून संगीतप्रेमी रसिकांना नाटयसंगीताचा उत्तम नजराणा दिला.

भारतातील श्वेत क्रांतीचे प्रणेते वर्गीस कुरियन यांच्या सहकारी दूध संस्थांच्या स्थापनेचा संघर्ष दाखवणारा राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त 'मंथन' हा चित्रपट दाखविण्यात आला. या चित्रपटाची पटकथा विजय तेंडूलकर यांची असून, श्याम बेनेगल दिग्दर्शित या चित्रपटात प्रमुख भूमिकेत नसिरुद्दीन शहा, स्मिता पाटील, ओम पुरी व गिरीश कर्नाड हे कलाकार आहेत.

अनेक राज्यस्तरीय व राष्ट्रीय पुरस्कारांनी गौरवलेला सुप्रसिद्ध कथा, कादंबरी व नाटककार श्री. रत्नाकर मतकरी यांच्या कथेवर आधारित व दिग्दर्शित 'इन्वेस्टमेंट' हा चित्रपट दाखवण्यात आला. तुषार दळवी, सुप्रिया मतकरी, सुलभा देशपांडे आणि संदीप पाठक यांच्या प्रमुख भूमिका असलेला हा चित्रपट मात्र अस्वस्थ करणारा अनुभव देऊन गेला. बदलती नीतीमूल्ये व त्यामुळे होणारा ऱ्हास अतिशय मार्मिकतेने या चित्रपटात मांडला गेला.

सुरुवातीला नमूद केल्याप्रमाणे सलग दहाव्या वर्षी एकपात्री अभिनयस्पर्धा भरवण्यात आली. या स्पर्धेमध्ये ३७ स्पर्धकांनी भाग घेतला. शेतकऱ्यांच्या आत्महत्या ते वृद्धाश्रमातील वृद्धांची दु:खे अशा विविध विषयांना स्पर्श करणाऱ्या संहिता सादर करण्यात आल्या.

दरवर्षीप्रमाणे अर्थसंकल्पावर आधारित कार्यक्रम घेण्यात आला. अतिशय सोप्या पद्धतीने सुप्रसिद्ध अर्थतज्ज्ञ डॉ. सुनीती नागपूरकर यांनी अर्थसंकल्पाचे विश्लेषण करून प्रेक्षकांच्या शंकांचे निरसन केले. याच कार्यक्रमाला जोडून श्री. दिवाकर दळवी यांनी आयुर्विमा व मेडिक्लेम याविषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

एक तरुण दिग्दर्शक किरण नाकती यांनी दिग्दर्शित केलेला व अनेक पुरस्कारांनी गौरवलेला 'सिंड्रेला' हा चित्रपट दाखवण्यात आला. झोपडपट्टीतील भावंडांच्या जगण्याचा संघर्ष मांडणाऱ्या या चित्रपटात रुपेश बने, यशस्विनी वेंगुर्लेकर, राधिका वेलणकर आदि कलाकारांनी उत्तम भूमिका साकारल्या.



Ahval text16.indd 29 2/2/2019 4:46:56 PM

या वर्षातील कार्यक्रमांचा शेवट अनिल व भाग्यश्री क्षीरसागर यांच्या 'शेअरबाजारातील सुरक्षित गुंतवणूक' याबाबतच्या मार्गदर्शनाने झाला.

कलाविभागाच्या सर्व उपक्रमांना मुख्य कार्यकारी मंडळाने कायमच प्रोत्साहन व पाठिंबा दिला. त्याबद्दल विभाग कार्यकारी मंडळाचा आभारी आहे. ऐरोली शाखेची व्यवस्थापन समिती, सर्व कर्मचारी, कंत्राटदार विविध वृत्तपत्रांचे प्रतिनिधी व रसिक प्रेक्षकांचे कलाविभागातर्फे आभार.

श्री. प्रदीप नाटेकर (उपाध्यक्ष) श्री. किशोर पेंढरकर (अध्यक्ष)

## मैत्री

संगीता जोशी (अध्यक्ष), दर्शना निमसे (कार्यवाह),
**सदस्य**- प्रीती देशपांडे, छाया देशमुख, आरती सप्रे, मंदा कोंडविलकर, सुनीता देवधर (सल्लागार)

प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीचा अहवाल सादर करताना आम्हांला आनंद होत आहे. यावर्षात मैत्री विभागातर्फे अनेक वैचारिक माहितीपूर्ण आणि मनोरंजनात्मक कार्यक्रम सादर केले.

**संस्कार शिबिर - १३ ते २० एप्रिल २०१५ :** या कालावधित ८ ते १४ वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी संस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. एकूण १३२ मुलांनी यात सहभाग घेतला. ओम्कार, श्लोक, संगीत, नृत्य आणि पौष्टिक खाऊ ही संस्कार शिबिराची वैशिष्ट्ये.

**१३ एप्रिल २०१५ :** कारगीलच्या शौर्यगाथा : अनुराधा प्रभुदेसाई यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन झाले. कारगिल युद्धात घडलेले प्रसंग, घटना आणि वीरगती प्राप्त झालेल्या जवानांविषयीची माहिती चित्रफितीव्दारे मुलांना सांगण्यात आली. या शौर्यगाथा ऐकून, पाहून मुले भारावून गेली.

**१४ एप्रिल २०१५ :** ऑलिंपिक कथा : डॉ. लक्ष्मीकांत कासट यांनी कार्यक्रमात मुलांना ऑलिंपिक खेळातील गमती जमती व खेळाडूंविषयीची तसेच या खेळांविषयीची माहिती दिली.

**१५ एप्रिल २०१५ :** लोकनृत्य, गाणी व श्लोक : सौ. दर्शना निमसे यांनी मुलांना 'माऊली-माऊली' या गाण्यावर नृत्य प्रशिक्षण दिले.

**१६ एप्रिल २०१५ :** पेपर क्विलिंग : पल्लवी शशिधरन यांनी पेपरच्या साहाय्याने ज्वेलरी कशी बनवायची याचे प्रशिक्षण मुलांना दिले. त्याचबरोबर ग्रीटींग कार्डवर पेपर क्विलिंगच्या साहाय्याने फुलांचे डिझाईन कसे तयार करायचे याचेही प्रशिक्षण देण्यात आले.

**१७ एप्रिल २०१५ :** व्यंगचित्रे : अभिजित रणदिवे यांनी व्यंगचित्रे कशी काढावीत, रंगसंगती स्केचेस कसे काढावेत याचे प्रशिक्षण मुलांना दिले.

**१८ एप्रिल २०१५ :** निसर्गचित्रे : चंद्रकात गणाचार्य यांनी मुलांना निसर्ग चित्र कसे काढावे, निसर्गाच्या विविध छटा चित्रातून कशा दाखवायच्या याचे प्रशिक्षण दिले.

**१९ एप्रिल २०१५ :** स्मरण आविष्कार (नाट्य) : सुहास सूर्यवंशी यांनी या कार्यक्रमात मुलांना नाट्यातील संवाद कसे बोलावेत, एखादा विषय घेऊन नाट्य कसे सादर करावे याचे प्रशिक्षण दिले.

**२० एप्रिल २०१५ :** समारोप : प्रमुख पाहुणे - माधव शिरवळकर आणि श्री. भा.ल. महाबळ यांनी मुलांशी संवाद साधत त्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. संगणकाविषयीची माहितीही मुलांना देण्यात आली. शिबिरात शिकविलेल्या वस्तूंचे प्रदर्शन मांडण्यात आले होते. सांस्कृतिक कार्यक्रमात मुलांनी गाणी, माऊली-माऊली हे समूह नृत्य, छोटीशी नाटिका तसेच आपली मनोगते व्यक्त केली. पाहुण्यांच्या हस्ते मुलांना बक्षिसे व प्रमाणपत्रे देण्यात आली. यावेळी चैत्रगौरीचे पूजनही करण्यात आले.

**८ जून २०१५ :** पाककृती : मेधा देव यांनी विविध पारंपारिक पाककृतींविषयीची माहिती महिलांना दिली. त्याचबरोबर अनेक सभासद मैत्रिणींनी आपापल्या पारंपरिक पदार्थांच्या रेसिपीज कशा करायच्या हे सांगितले. या कार्यक्रमाद्वारे अनेक पारंपरिक पदार्थांविषयीची माहिती महिलांना मिळाली.



Ahval text16.indd 30 2/2/2019 4:46:56 PM

**०४ जुलै २०१५ :** आदिवासी समाज आणि स्त्रीजीवन : प्रमुख वक्त्या सुनंदा पटवर्धन (सावित्रीबाई फुले पुरस्कार विजेत्या)या होत्या. त्यांनी आदिवासी समाजाची अवस्था, जीवनशैली तसेच तेथील स्त्रीजीवन विषयक माहिती, ठाणे जिल्हातील जव्हार, मोखाडा या दुर्गम भागात कार्यरत असलेल्या 'प्रगती प्रतिष्ठान' या संस्थेच्या सचिव सुनंदा पटवर्धन यांनी उपस्थित मैत्रिणींना दिली. या आदिवासी समाजापुढे असणाऱ्या समस्या समजावून घेत त्यांच्यासाठी शिक्षण, अपंगपुनर्वसन, नळपाणी योजना, सौरऊर्जा, जलसंधारण शेती अशा सोयीसुविधा उपलब्ध करून देत असताना त्यांना आलेले अनुभव मैत्रिणींशी संवाद साधून विशद केले.

**१८ जुलै २०१५ :** हास्ययोग : सीमा जोशी यांनी आपल्या जीवनात हास्याचे महत्त्व खूप आहे. ते आपल्याला आनंद तर देतेच त्याचबरोबर सर्व दु:खांवर सर्वोत्तम औषध देखील आहे. म्हणूनच हास्याचे काही प्रकार प्रात्यक्षिकासह सीमा जोशी यांनी उपस्थितांना शिकवले. या कार्यक्रमाचा भरपूर आनंद मैत्रिणींनी सहभागी होऊन लुटला.

**०१ ऑगस्ट २०१५ :** भक्तीसुगंध : भक्ती समुद्र (कीर्तनकार) यांनी आषाढी एकादशीच्या निमित्ताने पारंपरिक कीर्तन व भजन गायनाचा कार्यक्रम सादर केला. भरपूर महिला या कार्यक्रमाला हजर होत्या तसेच त्यांनी या कार्यक्रमाचा भरपूर आनंद लुटला.

**१४ ऑगस्ट २०१५ :** कार्यशाळा - पेपर क्विलींग : सुजाता निकम यांनी पेपर क्विलींग या नाजूक कला प्रकारात पेपरच्या माध्यमातून विविध सजावटींचे डिझाईन्स, शुभेच्छा पत्रे, दागिने, फुले बनविण्याचे प्रशिक्षण महिलांना दिले. जवळ जवळ ५०-६० सभासद मैत्रिणी यात सहभागी झाल्या होत्या.

**दि. २,३,४ ऑक्टोबर २०१५ :** भव्य ग्राहक मेळावा : याचे उद्घाटन स्मिता महाजन यांच्या हस्ते झाले. निरनिराळया गृहापयोगी वस्तूंचे ६७ स्टॉल्स लावण्यात आले होते यात विविध डिझायनर साडया, ड्रेस मटेरिअल, ज्वेलरी (पेपर क्विलींग), कुंदन रांगोळया, ग्रिटींग कार्ड, लेदर बॅग्ज, वेदिक गणित, अॅबॅकस पुस्तके, होममेड चॉकलेट्स, इन्स्टंट खरवस यासारख्या अनेक आकर्षक व उपयुक्त वस्तूंचे प्रदर्शन व विक्री करण्यात आली. तीन दिवस चालणाऱ्या या ग्राहक मेळाव्यात मोठ्या संख्येने ग्राहकांनी हजेरी लावली.

**दि. १७ नोव्हेंबर २०१५ :** आदिशक्तीचा जागर : नवरात्र उत्सवाच्या निमित्ताने पारंपारिक भोंडला व गरब्याचे आयोजन मैत्री तर्फे करण्यात आले होते. या कार्यक्रमाची सुरुवात 'या देवी सर्व भूतेषु' या श्लोकाने करण्यात आली. त्यानंतर देवीचे मंत्रपठण करण्यात आले. तसेच मैत्रीच्या सभासदांनी अनादी निर्गुण या जोगव्याचे नृत्यसादरीकरण केले. तसेच मुलींनी ''महालक्ष्मी अष्टकम'' या स्तोत्रावर आधारित शास्त्रीय नृत्याचे सादरीकरण केले . कार्यक्रमाची सांगता देवीच्या आरतीने केली तसेच उपस्थित महिलांना हळदी कुंकू, प्रसाद व खिरापत वाटण्यात आली. हा कार्यक्रम खूप उत्साहात जल्लोषात पार पाडला.

**दि. ३० नोव्हेंबर २०१५ :** मायक्रावेव्ह पाककृती प्रात्यक्षिक : शेफ शीजा शेख यांनी सॅमसंग इंडिया प्रा. लि. तर्फे मायक्रोवेव्ह मध्ये बनविण्यात येणाऱ्या विविध पाककृती कशा तयार करायच्या याचे प्रात्यक्षिक व विविध पदार्थांची माहिती व मायक्रोवेव्हचे पदार्थ कसे चटकन बनवता येतात याचे मार्गदर्शन केले. मोठ्या संख्येने महिला या कार्यक्रमासाठी उपस्थित होत्या. या सर्व पदार्थांचा आस्वाद मैत्रिणींनी घेतला.

**दि. १९ डिसेंबर २०१५ :** मैत्री चा ११ वा वर्धापन दिन सोहळा : अत्यंत आनंदाने उत्साहाने जल्लोषात साजरा होणारा असा हा कार्यक्रम. ''उत्सव नात्यांचा'' असा विषय घेवून स्त्रियांची विविध नात्यातून प्रकट होणारी रूपे तिच्या आयुष्यातील नात्यांबद्दलचे भावबंध, कथा, कविता, स्वगत, नाटिका, नृत्य या माध्यमातून सादर करण्यासाठी अनेक महिलांना पाचारण केले गेले. त्यानुसार अनेक मैत्रिणींनी या कार्यक्रमात सादरीकरण करण्यासाठी उत्साहाने सहभाग घेतला. स्त्रीची ही विविध नाती रंगमंचावर अलगद उलगडत गेली आणि एकमेकींच्या आठवणींचा सुंदर गोफ विणला जाऊन या बहारदार कार्यक्रमाला वेगळीच रंगत आली. कार्यक्रमात सहभागी झालेल्या व प्रेक्षक म्हणून आलेल्या सर्व मैत्रिणी सभासदांनी  या कार्यक्रमाचा मनमुराद आस्वाद घेतला. आणि हा वर्धापन दिनाचा सोहळा मोठ्या थाटामाटाने व दिमाखात पार पडला.

**२२ जानेवारी २०१६ :** तीळगूळ समारंभ : या समारंभाच्या निमित्ताने महिलांसाठी खुले व्यासपीठ निर्माण व्हावे या हेतूने पारंपरिक वेशभूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.  १६ वर्षावरील सभासदांना सहभाग घेण्याची संधी दिली गेली. पहिल्या तीन उत्कृष्ट स्पर्धकांच्या सादरीकरणाला बक्षिसे देण्यात आली. याही कार्यक्रमासाठी महिला उत्स्फूर्तपणे सहभागी झाल्या होत्या.

**०५ फेब्रुवारी २०१६ :** इकेबाना पुष्परचना : मनीषा कोंडसकर यांनी फुलांच्या विविध सजावटींनी वातावरणात एक वेगळेच चैतन्य निर्माण कसे होते तसेच या पुष्परचना कशा कराव्यात याविषयी कार्यशाळा घेतली. यात विविध इकेबाना पुष्परचनांविषयी माहिती व विविध फुलांच्या पुष्परचना त्यांनी करून दाखविल्या. अनेक मैत्रिणींनी ही कार्यशाळा पुन्हा घ्यावी असा आग्रह धरला.

**०९ मार्च २०१६ :** सन्मान स्त्रीशक्तीचा : जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने सर्वसामान्य आयुष्य जगत असताना काही वैशिष्ट्यपूर्ण कार्य करत असणाऱ्या अशा स्त्रीचा सन्मान मैत्री तर्फे दरवर्षी केला जातो. यावर्षी संजीवन दीप - पॅराप्लेजिक फाऊंडेशन या गतिमंद



Ahval text16.indd 31 2/2/2019 4:46:56 PM

मुलांच्या शाळेतील शिक्षिका - श्रीमती नलिनी भानूशाली ज्या स्वत: एका पायाने अपंग असूनही मुलांना प्रशिक्षण देतात, यांचा सन्मान मानपत्र देऊन करण्यात आला. त्याच बरोबर स्त्रियांविषयक कायद्यासंबंधीचे ज्ञान महिलांना मिळावे या उद्देशाने मुंबई हायकोर्टाच्या ॲड. सिद्धू विद्या यांनी सोप्या शब्दात महिलांना मार्गदर्शन केले. कोणत्याही संकटाला धीटपणे सामोरे जाण्याचे आत्मज्ञान स्त्रियांना आत्मसात करता आले पाहिजे असे त्यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले. मोठ्या संख्येने महिला या कार्यक्रमांस हजर होत्या. अनेक शंकांचे निरसन त्यांनी संवाद साधून केले.

**१९ मार्च २०१६ :** गीत तुझे गाण्यासाठी : सादरकर्ते अतुल माळी व स्मुग्धा माळी. मैत्री महिला विभाग व सुनीता म. देवधर ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने मंगेश पाडगावकर यांच्या कविता, गाणी यांवर आधारित बहारदार कार्यक्रम सादर करण्यात आला. अनेक सुमधुर गाणी सुरेल आवाजात सादर करण्यात आली आणि या निमित्ताने पाडगावकरांना श्रद्धांजली वाहण्यात आली. उपस्थित प्रेक्षकांनी गाण्यांचा मनमुराद आनंद लुटला.

प्रस्तुत अहवालात सादर करण्यात आलेल्या विविध कार्यक्रमांत मैत्रिणींनी घेतलेल्या उत्स्फूर्त सहभाग हीच आमच्या कार्यकारिणीची जोमाने कार्य करण्यासाठीची प्रेरणा आहे व मैत्रिणींची मोठ्या संख्येने असणारी उपस्थिती ही पाठीवर दिलेली प्रेमळ शाबासकीच आहे. येणाऱ्या पुढील वर्षातही असे भरघोस कार्यक्रमांचे आयोजन करुन आपल्याला भरपूर आनंद देण्याचा आमचा प्रयत्न नक्की असेल.

संस्थेच्या पाठिंब्यामुळे व मैत्रिणींच्या सहकार्यामुळेच आज 'मैत्री' ची वाटचाल यशस्वीरीत्या होत आहे. आम्ही कृतज्ञ आहोत, लोभ आहेच, तो वृद्धिंगत व्हावा.

दर्शना निमसे, कार्यवाह | संगीता जोशी, अध्यक्ष

## सुनीता म. देवधर ग्रंथालय

अध्यक्ष - मुकुंद बालंखे , कार्यवाह - प्रीती देशपांडे
सभासद :- आरती सप्रे, संगीता जोशी, सुनीता देवधर (सल्लागार)

रसिकांना, वाचकांना सप्रेम नमस्कार!

असे म्हटले जाते की,उत्कृष्ट ग्रंथ म्हणजे स्वादिष्ट फळांनी सर्व ऋतूत बहरलेला चविष्ट वृक्ष,मात्र तशी भूक असणे आवश्यक आहे. वरील ऊक्तीची गेल्या वर्षभरात उत्तम प्रचीती आली ती म्हणजे ग्रंथालय सभासद संख्येत झालेली लक्षणीय वाढ. मध्यंतरी पेपरमध्ये वाचनात आले होते की, अनेक ग्रंथालये सभासद संख्येच्या अभावी बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. अशा परिस्थितीत आपल्या ग्रंथालयाची वाटचाल ही निश्चितच कौतुकास्पद आहे.बालविभागासाठी स्वतंत्र कार्यक्रम करण्याचे यावर्षी जमले नाही परंतु या विभागात सभासदांची झालेली वाढ लक्षणीय आहे. पुढील वर्षात बालगोपालांसाठी विविध स्पर्धा घेण्याचा व्यवस्थापनाचा मानस आहे.

'वाचकसंवाद' या कार्यक्रमात वाचकांनी विविध विषयांवर आपली मते मांडली. कार्यक्रम एकंदरीत रंगतदार झाला. 'मन:शक्ती केंद्र लोणावळा' यांच्यातर्फे पाल्य व पालक संवाद या विषयावर अतिशय उद्बोधक व अभ्यासपूर्ण व्याख्यान झाले. पालकांनी या कार्यक्रमास उत्तम प्रतिसाद दिला. हा कार्यक्रम मन:शक्ती केंद्राने विनामूल्य सादर केला. समाजोपयोगी कार्यक्रमास हातभार लावणे या उदात्त हेतूने निरपेक्षपणे हे केंद्र कार्य करत असते. या केंद्राची विविध पुस्तके अल्प दरात ग्रंथालयात वाचकांसाठी उपलब्ध करून देण्यात आली.

'हसरा नाचरा जरासा लाजरा सुंदर साजिरा श्रावण आला.' या शीर्षका अंतर्गत श्रावणातील प्रमुख उत्सव गोकुळाष्टमी, तसेच कृष्ण हे भारतीय मनाला पडलेले एक सप्तरंगी मनोहारी स्वप्न आहे असे औचित्य साधून, 'भावलेला श्रीकृष्ण' यावर अनेकांनी अतिशय उत्तम सादरीकरण केले. हा कार्यक्रम रंगात रंगला श्रीकृष्ण या उक्तीनुसार अतिशय छान रंगला व प्रेक्षकांचा अतिशय उदंड प्रतिसाद लाभला.

ज्येष्ठ श्रेष्ठ कविवर्य स्व.मंगेश पाडगावकरांचे दु:खद निधन ही वर्षाअखेरीस चटका लावणारी घटना घडली. त्यांच्या कविता व गाण्यावर आधारित कार्यक्रम सादर करून ग्रंथालयातर्फे विनम्र श्रध्दांजली अर्पण करण्याचे व्यवस्थापनाने ठरवले व त्यानुसार ''गीत तुझे गाण्यासाठी'' नितांत सुंदर कार्यक्रम अतुल माळी व स्मुग्धा माळी व त्यांच्या सहकाऱ्यांनी रसिकांसाठी सादर केला. निवेदक श्री. महेंद्र कोंडे, जे नवी मुंबई महानगर पालिकेचे जनसंपर्क अधिकारीदेखील आहेत, यांनी अतिशय साध्या ओघवत्या शैलीत पाडगांवकरांच्या कविता सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली. प्रेक्षकांनीही या कार्यक्रमास गर्दी करून स्व. मंगेश पाडगावकरांना श्रद्धांजली वाहिली.



Ahval text16.indd 32 2/2/2019 4:46:57 PM

ग्रंथालयामध्ये नवीन टेबल तसेच रॅकची खरेदी करण्यात आली व सुयोग्य मांडणी केल्यामुळे ग्रंथालयाच्या आकर्षकतेत भर पडली . सूचना फलकावर वेळोवेळी सूचना लावल्या जातात त्यामुळे वाचकांची गैरसोय होत नाही. कर्मचारी वर्ग वाचकांच्या सूचनांची योग्य दखल घेतात व उत्तम सेवा पुरवण्याकडे त्यांचा कटाक्ष असतो. ग्रंथालयामध्ये ठेवलेली तक्रारवही रिकामी असणे ही ग्रंथालयाची जमेची बाजू आहे असे आम्ही मानतो.

केंद्र शासनाचे ई- ग्रंथालय सॉफ्टवेअर आपल्या तिन्ही संगणकांमध्ये टाकण्यात आले. साधारण ३ ते ४ महिन्यात ते पूर्णपणे कार्यान्वित होईल. अतिशय सोपे व लोकाभिमुख असे हे सॉफ्टवेअर आहे. त्यामुळे ग्रंथालयाच्या दैनदिन कार्यात अतिशय सुसूत्रता येईल व आर्थिकदृष्ट्यासुद्धा अल्प खर्चाचे असल्यामुळे ग्रंथालयाच्या उत्पन्नात वाढ होईल याची खात्री आहे.

दिवाळी अंक योजना ही दरवर्षी प्रमाणे भरपूर लोकप्रिय ठरली व भरघोस आर्थिक लाभ देऊन गेली. वाचकांना ५ महिन्यांपेक्षा जास्त दिवस दिवाळी अंकांची मेजवानी मिळते त्यामुळे त्यांचा प्रतिसाद लक्षणीय असतो.

ग्रंथ म्हणजे ज्ञानाचा खजिना, आनंदाचे महाद्वार व उच्चत्वाला नेणारा सोपान! अशा ग्रंथांचा संचय असणारे हे सुसज्ज ग्रंथालय म्हणजे महाराष्ट्र सेवा संघाची प्रमुख ओळख आहे. पुस्तक खरेदी,जुन्या पुस्तकांची पुनर्बांधणी व योग्य असे वर्गीकरण यात अतिशय नियमितता असल्याने ७२८७ पुस्तके व ५६६ सभासद यांचा कारभार सर्व कर्मचारीवर्ग उत्कृष्टपणे पेलतात. यावर्षी इ -ग्रंथालयाचे काम सुरू असल्याने ग्रंथमोजणी त्यानंतर केली जाईल याची नोंद घ्यावी सर्व कर्मचारीवर्ग ती कामगिरी यथार्थपणे पार पाडतील याबाबत तीळमात्रही शंका नाही. सर्व कर्मचारीवर्गाचे आभार व अभिनंदन.

मुख्य कार्यकारिणी अध्यक्ष डॉ. आनंद कट्टी ,उपाध्यक्ष श्री. प्रदीप सप्रे व कार्यवाह श्री.शं.गो. वीरकर यांचे संपूर्ण सहकार्य व प्रोत्साहन यामुळे ही वाटचाल साध्य करता आली याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार !

प्रीती देशपांडे, कार्यवाह — मुकुंद बालंखे, अध्यक्ष

## ऐरोली ग्रंथालय - ग्रंथस्थिती

| वर्षातील नवीन ग्रंथ खरेदी | वर्षात देणगी दाखल मिळालेले ग्रंथ | एकूण |
|---|---|---|
| ३२८ | २९९ | ६२७ |

**३१-०३-२०१६ रोजी उपलब्ध ग्रंथ -**

अहवाल वर्षात २६,५५१ /- रुपये किमतीची ग्रंथखरेदी करण्यात आली.

**ग्रंथालय सभासद तपशील** ३१-३-२०१६ अखेर सभासद

| विशेष सभासद | बाल विभाग | ग्रंथ विभाग | |
|---|---|---|---|
| ६ | ३५ | ३०१ | |
| ग्रंथ -अंक विभाग | दीर्घ मुदत सदस्य | अंक विभाग | एकूण |
| २०६ | ०८ | ०७ | ५६६ |

**ग्रंथालयात दरमहा येणाऱ्या अंक, मासिके व साप्ताहिके यांचा तपशील**

| प्रकार | मासिके | त्रैमासिके | पाक्षिके | साप्ताहिके | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| मराठी | ६६ | १ | २ | १६ | ८५ |
| हिंदी | १ | - | २ | - | ३ |
| इंग्रजी | ८ | - | १२ | ४ | २४ |
| एकूण | ७५ | १ | १६ | २० | ११२ |

**दिवाळी अंक योजना**

सभासद संख्या : ६२

अंकाच्या एकूण प्रती : ९९

खरेदी किंमत रुपये : १०,४०१ /-

**मोफत वाचनालयासाठी घेण्यात येणारी वृत्तपत्रे**

| **प्रकार** | **संख्या** | **नाव** |
|---|---|---|
| मराठी | ९ | महाराष्ट्र टाईम्स, लोकसत्ता, नवाकाळ, सकाळ, सामना, लोकमत, वार्ताहर पुढारी, धावते नवनगर |
| हिंदी | १ | नवभारत टाईम्स |
| इंग्रजी | ४ | टाईम्स ऑफ इंडिया, इंडियन एक्सप्रेस, डीएन्ए, मुंबई मिरर |

## अभ्यासिका

आरती सप्रे (अध्यक्ष) - अंजली पेंढरकर (कार्यवाह)
सभासद : मुकुंद शं. बालंखे , छाया देशमुख

नमस्कार! आम्हाला कळविण्यास आनंद वाटतो की ऐरोली येथे अभ्यासिकेची अत्यंत उपयुक्त व महत्त्वाची संकल्पना रुजविण्यात व चालविण्यात आपल्या महाराष्ट्र सेवा संघ, ऐरोली शाखेला यश आले आहे.

प्रति वर्षी दोन सत्रांत ५०० विद्यार्थी सभासद लाभ घेतात. यावर्षीच्या पहिल्याच सत्रांत ही संख्या ५३१ झाली आहे. सभासदांची गरज लक्षांत घेऊन ही सभासद संख्या ५५० पर्यंत वाढविणे संमत केले आहे.

वाढत्या सभासद संख्येच्या दृष्टीने स्वच्छता, पिण्याच्या पाण्यासाठी कुलर्स, योग्य प्रकाशासाठी एल.ई.डी. लाईट्स्.टेबले, खुर्च्या, कपा या सर्वांची चोख व्यवस्था करण्यात आली आहे.

पुस्तकांची विषयवार यादी तयार करुन ती लॅमिनेट करुन घेण्यांत आली आहे. देणगी म्हणून आलेल्या नवीन कपाटांत पुस्तके विषयवार लावून घेण्यात आली आहेत. यामुळे पुस्तके उपलब्ध करून देणे आणि त्यांची योग्य व्यवस्था ठेवणे सुलभ होते.

ओळखपत्र व इतर नियमावली चोख करून कोणतेही गैरप्रकार अभ्यासिकेत होणार नाहीत याची योग्य ती काळजी घेतली जाते.

अभ्यासिका वरच्या मजल्यावर असल्याने तेथून खाली कार्यालयांत संपर्क साधणे शक्य व्हावे यासाठी योग्य ती व्यवस्था करण्यात येत आहे.

आपल्या अभ्यासिकेत अभ्यास करुन यशस्वी झालेल्या अनेक उच्चशिक्षित विद्यार्थी सभासदांना संस्थेशी निगडित करून घेता यावे यासाठी त्यांच्या यशाची माहिती घेऊन त्यांबद्दल त्यांचा सत्कार करणे व त्यांचे मार्गदर्शन त्या शाखेच्या अभ्यासासाठी अभ्यासिकेत येणाऱ्या पुढील विद्यार्थी सभासदांना मिळावे यासाठी त्यांचे एखादे व्याख्यान आयोजित करण्याचे नियोजन सुरू आहे.

मुख्य कार्यकारी मंडळाच्या सहकार्याने व वेळोवेळीच्या मार्गदर्शनाने अभ्यासिका उत्तरोत्तर समृद्ध होईल ही आशा!

अंजली पेंढरकर, कार्यवाह — आरती सप्रे, अध्यक्ष



Ahval text16.indd 34 2/2/2019 4:46:57 PM

महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड तर्फे देण्यात आलेले सु.ल. गद्रे (मातोश्री) साहित्यिक, कलाकार व कै. ल.ग. गद्रे शैक्षणिक पुरस्कार तसेच सु.ल. गद्रे साहित्यिक, कलाकार व महाराष्ट्र सेवा संघाचा सामाजिक संस्था पुरस्कार खालीलप्रमाणे

| वर्ष | साहित्यिक पुरस्कार | कलाकार पुरस्कार | शिक्षक / संस्था पुरस्कार |
|---|---|---|---|
| १९९४ | श्रीमती शांता शेळके | श्रीमती भक्ती बर्वे | सर्वश्री. वसंतराव आगाशे व हरेराम बोडस |
| १९९५ | श्री. शं.ना.नवरे | श्रीमती ललिता पवार | सर्वश्री. चंद्रकांत मापारी व कृ.ल.पटवर्धन |
| १९९६ | श्रीमती सरोजिनी वैद्य | श्री. यशवंत देव | श्री. सय्यद गुलाम दस्तगीर व श्रीमती रेणू दांडेकर |
| १९९७ | श्री. अनिल अवचट | श्रीमती सुचेता भिडे चापेकर | सर्वश्री. अनिल जोशी व भानसिंग पाटील |
| १९९८ | श्री. रत्नाकर मतकरी | श्री. बाबूराव सडवेलकर | श्री. अरुण जोशी व श्रीमती विजया वाड |
| १९९९ | श्रीमती मंगला गोडबोले | श्री. रामदास पाध्ये | श्री. रामकुमार सावंत व श्रीमती वर्षा सहस्त्रबुध्दे |
| २००० | श्रीमती आशा बगे | श्री. शि. द. फडणीस | सर्वश्री. वामन हेर्लेकर, कुलकर्णी व अरुण फाटक |
| २००१ | श्री. लक्ष्मण लोंढे | श्रीमती प्रभा अत्रे | श्री. न.ल. गाडगीळ व श्रीमती सुचेता पडळकर |
| २००२ | श्री. ह.मो. मराठे | श्रीमती प्रिया तेंडुलकर | सावरकर प्रतिष्ठान ,सांगली |
| २००३ | श्रीमती अरुणा ढेरे | श्री. भरत दाभोळकर | दादोजी कोंडदेव सैनिकी शाळा, तासगांव |
| २००४ | श्री. मारुती चित्तमपल्ली | श्रीमती स्मिता तळवलकर | राणी लक्ष्मीबाई सैनिकी मुलींची शाळा, पुणे |
| २००५ | श्री. अशोक जैन | श्री. अरविंद गजेंद्रगडकर | सर्वश्री श्री. बाळासाहेब माने व विठ्ठल माने |
| २००६ | श्रीमती प्रतिभा रानडे | श्री. नितीन देसाई | सर्वश्री. रमेश लोणारे व मनोहर नरांजे |
| २००७ | श्रीमती मीना प्रभू | श्री. मोहन जोशी | प्रबोधिनी ट्रस्ट, नाशिक |
| २००८ | श्रीमती उमा कुलकर्णी | श्री. अशोक पत्की | आविष्कार, रत्नागिरी |
| २००९ | श्री. जगदीश खेबूडकर | श्रीमती उषा मंगेशकर | वात्सल्य ट्रस्ट, मुंबई |
| २०१० | डॉ. जयंत नारळीकर | श्री. दिलीप प्रभावळकर | लोकबिरादरी प्रकल्प, हेमलकसा |
| २०११ | श्री. ना.धों. महानोर | सौ. वीणा सहस्त्रबुद्धे | कुष्ठरोग निवारण समिती, नेरे, पनवेल. |
| २०१२ | डॉ. विजया राजाध्यक्ष | श्री. विक्रम गोखले | मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्र - पुणे |
| २०१३ | प्रा. शेषराव मोरे | श्री. प्रशांत दामले | सह्याद्रि आदिवासी बहुविध सेवा संघ, देवबांध |
| २०१४ | श्री. निरंजन घाटे | श्री. उत्तम पाचारणे | हेल्पर्स ऑफ दी हॅन्डिकॅप्ड, कोल्हापूर |
| २०१५ | डॉ. प्रतिमा इंगोले | डॉ. मोहन आगाशे | स्नेहज्योती निवासी अंध विद्यालय, दापोली |
| २०१६ | माधुरी शानभाग | सुहास जोशी | ——— |

## पं. वासुदेव आत्माराम लाटकरशास्त्री संस्कृत सन्मान पुरस्कार

| वर्ष | पुरस्कारप्राप्त विद्वान | क्षेत्र |
|---|---|---|
| २०११ | श्री. देवदत्त गोविंद पाटील | अध्ययन व अध्यापन |
| २०१२ | डॉ. भाग्यलता पाटसकर | अध्ययन व अध्यापन |
| २०१३ | डॉ. मल्हार कुलकर्णी | अध्ययन व अध्यापन |
| २०१४ | श्री. गणेश्वर सांब दीक्षित | अध्ययन व अध्यापन |
| २०१५ | डॉ. मधुसूदन पेन्ना | कुलगुरू |



Ahval text16.indd 35 2/2/2019 4:46:57 PM

वैविध्यपूर्ण साहित्यकृतींना प्रोत्साहन मिळावे म्हणून 'साहित्य साधना' पुरस्कार न.चिं. केळकर ग्रंथालयाने १५-०४-२००६ पासून सुरू केला आहे.

| वर्ष | पुरस्कारप्राप्त लेखक | साहित्यकृती |
|---|---|---|
| २००६ | श्री. भारत सासणे | शुभवर्तमान |
| २००७ | श्री. गिरीश प्रभुणे | पारधी |
| २००८ | डॉ. संजय ओक | अवनत होई माथा |
| २००९ | श्री. सुमेध वडावाला | मनश्री |
| २०१० | डॉ. संजय ढोले | प्रेमाचा रेणू |
| २०११ | श्री. गिरीश कुबेर | युद्ध जिवांचे |
| २०१२ | श्रीमती आशा आपराद | भोगिले जे दुःख त्याला |
| २०१३ | डॉ. सदाशिव शिवदे | ज्वलज्ज्वलनतेजस संभाजी राजा |
| २०१४ | हेमंत देसाई | बॉम्बे टॉकीज |
| २०१५ | डॉ. इसादास भडके | गन गन भोवरी |
| २०१६ | बालिका ज्ञानदेव /रवींद्र कोरडे | मॅगझिनीतून सुटतेय गोळी /धुसर झालं नसतं गांव |

**विविध कलाक्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ज्येष्ठ कलाकाराचा सन्मान (एक कलाकार - एक संध्याकाळ)**

| वर्ष | कलाकाराचे नाव | क्षेत्र |
|---|---|---|
| २००५ | श्री. दशरथ पुजारी | संगीत |
| २००६ | श्री. के.ज.पुरोहित (शांताराम) | साहित्य |
| २००७ | श्री. भालचंद्र पेंढारकर | नाट्य. |
| २००८ | श्री. सुहास भालेकर | लोकनाट्य |
| २००९ | श्री. मोरेश्वर कुंटे | मंदिर कोशकार |
| २०१० | श्री. प्रभाकर जोग | व्हायोलीन वादक, संगीतकार |
| २०११ | श्री. भा. ल. महाबळ | साहित्य |
| २०१२ | श्रीमती पुष्पा पागधरे | गायन |
| २०१३ | श्री. चंद्रकांत खोत | साहित्य |
| २०१४ | श्री. वसंत आजगावकर | गायन |
| २०१५ | श्री. जयंत सावरकर | नाट्य |

**समाजसेवेत कार्यरत असणाऱ्या स्त्री समाजसेवकांना दिला जाणारा, 'सावित्रीबाई फुले स्त्री गौरव पुरस्कार'**

| वर्ष | समाजसेवकाचे नाव | संस्था / क्षेत्र |
|---|---|---|
| २०१५ | श्रीमती सुनंदा पटवर्धन | 'प्रगती प्रतिष्ठान', जवाहर |
| २०१६ | श्रीमती उषा मडावी | गोंदिया |



Ahval text16.indd 36 2/2/2019 4:46:57 PM

**देशाच्या सीमा सुरक्षित ठेवणाऱ्या संरक्षणदलातील वीरांप्रती कृतज्ञता व्यक्त करणाऱ्या 'प्रेरणा' पुरस्काराचे मानकरी**

| **वर्ष** | **पुरस्काराचे मानकरी** | **क्षेत्र** |
|---|---|---|
| २०१५ | ग्रुप कॅप्टन दिलीप परुळकर, व्ही.एस.एम. (निवृत्त) | हवाई दल |
| | कमांडर रवींद्र पाठक | नावीक दल |
| | सुभेदार मेजर अशोक काशीद | भूदल |
| | श्री. अप्पा परब | इतिहास संशोधक |

**स्व. अुद्धवराव त्रिविक्रम आठले स्मरणार्थ 'संस्कृत भाषा प्रसार' पुरस्कार**

| | |
|---|---|
| २०१५ | सौ. तरंगिणी खोत |
| | सौ. अर्चना कतिरा |



Ahval text16.indd 37 2/2/2019 4:46:57 PM